# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### बुलढाणा जिल्ह्यात वाढणाऱ्या गुन्हेगारीला आळा घालण्याबाबत

**(१) २४२९ (२५-०४-२०२५). डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील ३३ पोलीस स्टेशनची आकडेवारी पाहता सन २०२४ मध्ये जिल्ह्यात ४७ खून झाले असून १२४ बलात्कार, १३ दरोडे, २२६ घरफोड्या, २९० ठिकाणी दंगे, १४० फसवणुकीचे गुन्हे झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षी जिल्ह्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने विविध ठिकाणी १६ छापे मारून २३ लाचखोरांना पकडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यात इतक्या मोठ्या प्रमाणात गुन्हेगारीच्या घटना घडत असल्याने यावर तात्काळ समिती नियुक्त करुन घटनांवर आळा घालण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) बुलढाणा जिल्ह्यात सन २०२४ मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून विविध ठिकाणी केलेल्या कारवाई मध्ये १७ आरोपींविरुध्द एकूण ११ गुन्हे दाखल केले आहेत. सदरचे आरोपी हे पोलीस विभागाव्यतीरीक्त इतर विभागाचे कर्मचारी आहेत.

(३) बुलढाणा जिल्ह्यातील गुन्हेगारीच्या घटनांना आळा घालण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आलेली नाही.

तथापि, जिल्ह्यातील गुन्हेगारी घटनांना आळा बसावा याकरिता, खालीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात येत आहेत :-

१. क्राईम मॅपिंग पॉइंट निश्चीत करुन सदर पॉइंटवर २४ तास मोटार सायकलवर सशस्त्र पेट्रोलिंग नेमण्यात येते.

२. जबरीचोरी, सोनसाखळी चोरी, घरफोडी, दरोडा अशा प्रकारचे गंभिर स्वरुपाचे मालमत्तेचे गुन्हे घडल्यास SOP मध्ये दिलेल्या कार्यपध्दतीनुसार पोलीस घटकाकडून नाकाबंदी, निगराणी, बदमाश चेक करणे, जेलमधून सुटलेले आरोपी चेक करणे, मोटारसायकल पेट्रोलिंग करणे इ. उपाययोजना अंमलात आणुन गुन्हयातील अज्ञात आरोपी व मुद्देमालाचा शोध घेण्याचे दृष्टीने तपास करण्यात येतो.

३. बुलढाणा जिल्हात अचानक उदभवणारी कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती तसेच महत्त्वाचे वेळी पोलीस अधिकारी व अंमलदार यांना तात्काळ घटनास्थळी हजर होण्यासाठी Quick Response Alert System तयार करण्यात आली आहे.

४. प्राणांतिक अपघात व इतर अपघात रोखण्यासाठी बैठक आयोजित करुन रस्ते अपघात कमी करण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करण्यात आला आहे.

५. सदरची परिस्थिती हाताळण्यासाठी पुर्वीच्या ०४ पथकांव्यतिरिक्त ०३ अतिरिक्त दंगाकाबू पथके स्थापन

करण्यात आले आहे.

६. संघटीत गुन्हेगारी नियंत्रणात आणण्यासाठी सन २०२४ मध्ये १४ आरोपींविरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.

७. बुलढाणा जिल्ह्यात विघातक कृत्यांना आळा घालण्यासाठी MPDA अन्वये सन २०२४ मध्ये ११ आरोपींना स्थानबध्द करण्यात आले आहे.

८. बुलढाणा जिल्ह्यातील मालमत्तेचे गुन्हे करणारे फरार आरोपी यांचे शोधकामी व अटक करणेकामी तसेच गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा, बुलढाणा यांच्या सोबत ०२ अधिकचे पथक स्थापन करण्यात आले आहे.

९. बुलढाणा, जालना, अकोला, यवतमाळ, जळगांव या जिल्ह्यातील जेलमधून सुटलेल्या होणारे आरोपींची अद्ययावत माहिती ठेवण्यात येवून त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करण्यात येते. तसेच दर ०७ दिवसाला जेलमधून सुटलेल्या आरोपींबाबत आढावा घेण्यात येतो.

गुन्हेगारी घटकांना आळा बसविण्याच्या दृष्टीने दिनांक ०१ सप्टेंबर, २०२४ पासून राबविण्यात आलेल्या वरील उपाययोजनांमुळे सन २०२४ ते आजपावेतो तत्सम कालावधीशी तुलना करता एकूण ७२ गुन्ह्यांची घट झाली आहे.

(४) विलंब झाला नाही.

---

## खापर, अक्कलकुवा, मोलगी, धडगाव (जि. नंदुरबार) येथील शासकीय विश्रामगृहांची झालेली दुरवस्था

**(२) २६३४ (२८-०४-२०२५). श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खापर, अक्कलकुवा, मोलगी, धडगाव (जि. नंदुरबार) येथील शासकीय विश्रामगृहांची दुरवस्था झालेली असून विश्रामगृहांच्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विश्रामगृहांच्या ठिकाणी कोणतेही कर्मचारी नियुक्त नसल्यामुळे उक्त तालुक्यात येणाऱ्या अभ्यंगतांची मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करून खापर, अक्कलकुवा, मोलगी, धडगाव येथे नव्याने विश्रामगृहाच्या इमारतींना मंजुरी देण्याच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१८-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) खापर व अक्कलकुवा येथील शासकीय विश्रामगृहाचे मान्यतेसाठी निधी उपलब्धता विचारात घेता अग्रक्रम, निकष व शासनाचे धोरण विचारात घेऊन, योग्य कार्यवाही करण्यात येईल. तसेच धडगांव व मोलगी येथील शासकीय विश्रामगृहांची इमारत सुस्थितीत असून याबाबत कोणतेही नवीन बांधकामाचे प्रस्ताव तयार करण्यात आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर महापालिकेकडून लावण्यात येत असलेला**
**६४% सुपर टॅक्स कर कमी करण्याबाबत**

**(३) २८२७ (०१-०५-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महापालिकेमध्ये व्यावसायिक मालमत्ता भाडेतत्त्व करारावर ६४% इतक्या प्रमाणात सुपर टॅक्सची आकारणी केली जात असल्याने सदर सुपर टॅक्स कर कमी करण्याची मागणी व्यावसायिकांकडून होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर महापालिका राज्यातील नव्हे तर देशातील सर्व महापालिकेपेक्षा जास्त कर आकारत असल्याचे मत व्यावसायिकांनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर शहर हे कामगारांचे शहर म्हणून गणले जाते तेथे अद्याप विमानसेवा व महापालिकेकडून पाणी विविध सोयी सुविधा तसेच मोठमोठे उद्योग व्यवसाय येण्यासाठी पुरविण्यात येणाऱ्या बाबी उपलब्ध होत नसल्याने शिवाय आकारण्यात येणाऱ्या भरमसाठकरांचा विचार करून कोणत्याही कंपन्या शहरात येण्यास धजावत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास सोलापूर महापालिकेकडून लावण्यात येत असलेला ६४% सुपर टॅक्स कर कमी करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत काय,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०२-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व्यावसायिक प्रयोजनार्थ भाड्याने दिल्या जाणाऱ्या मिळकतींवर कर आकारणी करताना आकारण्यात येणारा सुपर टॅक्स महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.१३०, दिनांक २० फेब्रुवारी, २०२५ अन्वये रद्द करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्हयातील विकास कामांबाबत**

**(४) ३५८१ (२८-०४-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील विकास कामे करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री यांनी अडीच हजार कोटी रूपयांची घोषणा संभाजीनगर येथे मराठवाडा मुक्ती संग्राम कार्यक्रमात केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील घोषणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जोड परळी, ममदापूर, पिंपळगाव कुंटे, या बंधाऱ्यांना निधी, साईबाबा तीर्थ विकास आराखडयास निधी, सोनपेठ व पालम साठी कस्तुरबा गांधी विद्यालय, परभणी येथील जिल्हा क्रिडा संकुलनासाठी निधी मंजूर करण्यात येऊन प्रत्यक्षात वर्ग करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी सदरील कामे पुर्ण करण्यासाठी किती कालावधी अपेक्षीत असून शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१८-०२-२०२६) :** (१), (२), (३), (४) छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाडा मुक्ती संग्राम कार्यक्रमांतर्गत तत्कालीन माननीय मुख्यमंत्री यांनी केलेल्या घोषणांच्या अनुषंगाने परभणी जिल्हयातील विकासकामांबाबत विविध विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार.

१) जोड परळी,ममदापूर, पिंपळगाव कुंटे या बंधाऱ्यांना एकूण रू.९६.६६७२ कोटी इतक्या निधीचे वितरण करण्यात आलेले आहे.

२) तिर्थक्षेत्र साईबाबा विकास आराखडयास रू. ९१.८१ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी रू. ५०.०० कोटी निधी वर्ग करण्यात आलेला असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

३) परभणी जिल्हयातील सोनपेठ व पालम तालुक्यात निवासी बालिका विद्यालय राज्य शासनामार्फत सुरु करण्याकरिता माननीय मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

४) परभणी जिल्हा क्रीडा संकुलासाठी नगरपरिषद व बचत भवन येथील सात एकर जागेवर ८००.०० लक्ष अनुदानातून विविध क्रीडा सुविधा उभारून नागरिकांसाठी खुल्या करण्यात आल्या आहेत. तसेच या क्रीडा संकुलासाठी कृषी विद्यापीठाच्या जागेच्या हस्तांतरणाबाबतची कार्यवाही कृषी विभागामार्फत प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे गणेशखिंड शहर मंडला अंतर्गत पिंपरी विभागातील सांगवी उपविभागाचे विभाजन करून हिंजवडी उपविभाग व ४ शाखा कार्यालये निर्माण करण्याबाबत

**(५) ४४४६ (२७-०४-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण पुणे परिमंडळाच्या पिंपरी विभागाअंतर्गत सांगवी उपविभागाच्या ग्राहक संख्येत दरवर्षी सरासरी ८% टक्क्यांनी वाढ होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या ग्राहक संख्येमुळे अधिकारी/कर्मचारी/जनमित्र यांच्यावर कामाचा अतिरिक्त बोजा पडत असून, नविन उपविभाग व शाखा कार्यालयामुळे महावितरणवर आर्थिक बोजा न पडता कर्मचारी संख्या वाढल्यास अचुक वीज देयके, रोहित्र चोरी रोखणे शक्य होण्याकरिता, ग्राहकांच्या तांत्रिक व अतांत्रिक तक्रारी निवारण कामात सुसुत्रता आणता येईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी वीज ग्राहकांच्या सोईसाठी व महसूल वाढीसाठी सांगवी उपविभागाची पुर्नरचना करून नविन हिंजवडी उपविभागांसह ४ शाखा कार्यालये पिंपळे गुरव, पिंपळे निलख, वाकड व एमआयडीसी हिंजवडी मंजूरीसाठी प्रस्ताव संचालक (संचलन), मुंबई कार्यालयाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पिंपरी विभागातील सांगवी उपविभागाची पुर्नरचना करून नवीन ४ शाखा कार्यालये व हिंजवडी येथे नवीन उपविभाग कार्यालय निर्माण करण्याच्या प्रस्तावास मंजुरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०२६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) पुणे परिमंडळातील गणेशखिंड मंडळांतर्गत पिंपरी विभागात येणाऱ्या सांगवी उपविभागाचे विभाजन करुन नवनिर्मित हिंजवडी उपविभागासह ०४ शाखा कार्यालये पिंपळे गुरव, पिंपळे निलख, वाकड व एमआयडीसी हिंजवडी शाखा निर्माण करण्याबाबतचा आदेश दिनांक २० फेब्रुवारी, २०२५ महावितरण कंपनीमार्फत निर्गमित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महापालिका प्रशासनाने यावर्षी तब्बल ३६५ मेट्रिक टन कचरा शहरात होणार असल्याचा आधार देऊन निविदा काढल्याबाबत**

**(६) ५१६८ (०१-०५-२०२५). श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरात गेल्या काही वर्षापासून २२५ मेट्रिक टन कचरा होत असल्याचे जुने माप बाजूला सारून महापालिका प्रशासनाने यावर्षी तब्बल ३६५ मेट्रिक टन कचरा शहरात होणार असल्याचा आधार देऊन तब्बल अडीचशे कोटी रुपयांचे टेंडर काढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्लास्टिक बंदी व अन्य उपक्रम राज्यात राबविले जात असल्याने कचऱ्याचे प्रमाण कमी होणे अपेक्षित असताना उलट नांदेड शहरात थेट पन्नास टक्के अधिकचा कचरा निर्माण होण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत नांदेड शहरामध्ये एकूण १,४०,१८९ मालमत्ता आणि अंदाजे ८.०३ लक्ष लोकसंख्या विचारात घेऊन प्रतिदिन प्रति व्यक्ती ४५० ग्रॅम प्रमाणे सरासरी अंदाजे ३६१.३५ मेट्रिक टन घनकचरा निर्मिती अपेक्षित आहे. मागील एक वर्षापासून शहरातून सरासरी ३६० मे.ट. घनकचरा संकलन करुन उचलून वाहतूकीद्वारे प्रक्रिया केंद्राकडे पाठविण्यात येत आहे. यानुसार प्रतिदिन कचरा निर्मिती अंदाजे ३६५ मे.ट. गृहीत धरुन महानगरपालिकेकडून निविदा प्रक्रिया पार पाडण्यात येवून पात्र निविदाधारकासोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यात आले आहेत.

(२) सन २०११ च्या जनगणनेनुसार शहराची ५५०४३९ इतकी लोकसंख्या होती. सन २०१७ मध्ये शहराची लोकसंख्या अंदाजे ६,५०,००० होती. प्रति व्यक्ती ३५० ग्रॅम कचरा निर्मिती यानुसार अंदाजे सरासरी २२७ मेट्रिक टन कचना निर्माण होत होता.

स्वच्छ भारत अभियान आणि solid waste Management Manual-२०१६ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार सन २०२५ मध्ये शहराची ८.०३ लक्ष एवढी अंदाजे लोकसंख्ये प्रमाणे प्रतिदिन प्रति व्यक्ती निर्माण होणारा कचरा ४५० ग्रॅम प्रमाणे या प्रमाणे अंदाजे ३६१ मेट्रिक घनकचरा निर्मिती होत आहे.

(३) याबाबत प्राप्त तक्रारींचे अनुषंगाने आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगापालिका यांचेकडून वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात आला होता. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगापालिका यांनी दिनांक १५ एप्रिल, २०२५ रोजीचे पत्रान्वये सादर करण्यात आलेल्या अहवाल शासनाकडून मान्य करण्यात आला असून दिनांक २१ ऑगस्ट, २०२५ रोजीचे शासन पत्रान्वये त्यानुषंगिक पुढील उचित कार्यवाही करणेबाबत आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांना इंटरनेट सुविधा पुरवणेबाबत**

**(७) ५२६९ (०५-०५-२०२५). श्री.प्राविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांना इंटरनेट सुविधा जोडणी दिलेली नसल्यामुळे शाळांमध्ये स्मार्ट बोर्ड, संगणक आदी सुविधा असूनही इंटरनेट सुविधेचा अभाव असल्याने त्यांचा वापर होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शाळांना १०० टक्के इंटरनेट सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-०२-२०२६) :** (१) संगणकीय साहित्य उपलब्ध असलेल्या, आयसीटी लॅब, स्मार्ट क्लासरूम, डिजिटल लायब्ररी उपलब्ध करून दिलेल्या शाळांमध्ये ई-बुक्स, PDF फाईल व व्हिडीओचा वापर इंटरनेटची सुविधा नसलेल्या शाळांमध्ये करण्यात येत आहे.

(२) समग्र शिक्षा योजनेतून आयसीटी या उपक्रमांतर्गत २५४९ आयसीटी शाळांमध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पी.एम.श्री. या योजनेतून निवडलेल्या ८६० पी.एम.श्री. शाळांमध्ये इंटरनेट सुविधा शाळा स्तरावरून उपलब्ध करून घेण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

राज्य शासनामार्फत १११५ ग्रामीण भागातील शासकीय माध्यमिक शाळांमध्ये भारत संचार निगम लिमिटेड, मुंबई कार्यालयामार्फत इंटरनेट सुविधा शाळांमध्ये उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

सन २०२४-२५ यु-डायस प्लस प्रणालीमधील माहितीनुसार राज्यातील ६४,७५१ शासकीय शाळांपैकी ३९,१७२ (६६.४६%) शाळांमध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बालभारती इयत्ता ८ वीच्या पुस्तकात छापण्यात आलेला रत्नागिरी येथील पतित पावन मंदिराच्या निर्मितीबाबतचा चुकीचा इतिहास**

**(८) ५४९१ (०५-०५-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दानशूर भागोजीशेठ कीर यांनी श्रीमान वि. दा. सावरकर यांच्या विनंतीवरून रत्नागिरीत जागा खरेदी करून त्यावर स्वखर्चाने सन १९३१ मध्ये ऐतिहासिक असे पतीतपावन मंदिर बांधले आणि त्यावेळच्या स्पृश्य-अस्पृश्य समाजाला मंदिर प्रवेशासाठी खुले केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९३१ मध्ये पतितपावन मंदिराच्या उभारणीपासून दानशूर भागोजीशेठ कीर दरवर्षी दिवाबत्ती व देखभालीसाठी दीड हजार रुपये देत असत, त्याचप्रमाणे या मंदिराशेजारी चाळ बांधण्यासाठीचा खर्चदेखील कीर यांनी खाजगीतून केला, असे सन १९३३ च्या 'भागोजी बाळोजी कीर चॅरिटेबल ट्रस्ट' च्या ऑडिट रिपोर्ट मध्ये दर्शवला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ३० वर्षांपूर्वीच्या इतिहासाच्या पुस्तकात पतितपावन मंदिर हे श्रीमान वि. दा. सावरकरांच्या विनंतीवरून दानशूर भागोजीशेठ कीर यांनी बांधले असा उल्लेख असून देखील सन २०१४-१५ मध्ये हा उल्लेख काढण्यात आल्याचे दिसून आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अखिल भारतीय भंडारी समाज महासंघ, रत्नागिरी तालुका भंडारी समाज संघ तसेच भागोजी कीर

समिती यांनी याबाबत तत्कालीन मुख्यमंत्री व तत्कालीन शिक्षणमंत्री यांच्याशी पत्रव्यवहार केला असून शिक्षण मंत्र्यांनी त्या पत्रावर शेरा मारून हा बदल करण्याचे निर्देश संबंधितांना दिले होते, मात्र अद्यापपर्यंत पुस्तकात तशी सुधारणा झालेली नसल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१८-०२-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.
(२), (३), (४), व (५) सन १९९८ ते २००८ या कालावधी दरम्यान शाळांना लागू असलेल्या इयत्ता आठवीच्या भारताचा इतिहास (आधुनिक काळ) या पाठ्यपुस्तकातील भारतीय प्रबोधन या पाठात दानशूर भागोजी शेठ कीर यांच्याविषयीचा आशय समाविष्ट नव्हता. तसेच महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळामार्फत सन २००९ यावर्षी प्रकाशित करण्यात आलेल्या प्रथम आवृत्ती आधुनिक भारताचा इतिहास इयत्ता आठवी या पुस्तकातील भारतीय प्रबोधन या पाठात देखील दानशूर भागोजी शेठ किर यांच्या विषयीचा आशय समाविष्ट नव्हता. सदरचे पाठ्यपुस्तक सन २०१७ या वर्षापर्यंत शाळांना लागू होते.

प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ यास अनुसरून इतिहास व नागरिकशास्त्र पाठ्यपुस्तकाची प्रथम आवृत्ती सन २०१८ यावर्षी प्रकाशित करण्यात आली. यामधील पाठ क्रमांक पाच मध्ये सामाजिक व धार्मिक प्रबोधन या पाठात हिंदू समाजातील चळवळ या उपमुद्यात स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांनी पतीत पावन मंदिराची निर्मिती केल्याचा उल्लेख करण्यात आला होता; परंतु श्री. वैभव तारी व श्री. नवीनचंद्र बांदिवडेकर यांनी पाठविलेल्या पत्रानुसार सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात करण्यात आलेल्या अधिप्रमाणात श्री. भागोजी कीर यांच्या कार्याच्या अभ्यासक्रम विद्यार्थी वयोगट व पृष्ठ मर्यादा इत्यादी बाबींचा विचार करून योग्य त्या माहितीसह समाविष्ट करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ योजनेसाठी उत्पन्नाची वार्षिक मर्यादा वाढविण्याबाबत

**(९) ७०३२ (०५-०५-२०२५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ योजनेसाठी उत्पन्नाची वार्षिक मर्यादा रुपये २१०००/- असल्याने अनेक निराधार व गरीब जनतेला या योजनेचा लाभ घेता येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेच्या उत्पनाची मर्यादा किमान रुपये ५०,०००/- पर्यंत करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सदर योजनेच्या उत्पनाची मर्यादा वाढविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ (२०-०२-२०२६) :** (१) व (२) दिनांक २० ऑगस्ट, २०१९ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार पात्र लाभार्थ्यांना वार्षिक उत्पनाची मर्यादा प्रतिवर्षी रु.२१०००/- आणि दिव्यांग लाभार्थ्यांसाठी वार्षिक उत्पनाची मर्यादा प्रतिवर्षी रु.५०,०००/- इतकी आहे. तसेच या योजनाअंतर्गत एकूण ४३,०७,९६० इतक्या लाभार्थ्यांना माहे ऑगस्ट, २०२५ अखेर अनुदान वाटप करण्यात आले आहे.

(३) संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेसाठी उत्पन्नाची मर्यादा वाढविणेबाबत प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कासा (ता.डहाणू,जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दीत मोठया प्रमाणात कचऱ्याच्या ढीगांमुळे आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याबाबत**

**(१०) ७२६१ (१९-०९-२०२५). श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कासा (ता.डहाणू,जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दीतील चारोटी - कासा या महामार्गावर अनेक ठिकाणी विशेषत: कासा पोस्ट आफीस, पार्वती निवास शेजारी नागरिक प्लॅस्टिक, भाजीपाला व दुर्गंधीयुक्त कचरा टाकला जात असल्याने परिसरात मोठया प्रमाणात कचऱ्याच्या ढीगांमुळे अस्वच्छता व दुर्गंधीमुळे आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कचऱ्याच्या ढीगांमधील कचरा मोकाट जनावरे खात असल्याने त्यांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे तसेच कासा बाजारपेठ, भिसे नगर, पाटील पाडा, बळवी पाडा, गायकवाड पाडा, पोस्ट आफीस व पार्वती निवास येथे कचरा विल्हेवाटाची सुविधा नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, पावसाळयापूर्वी कचऱ्याची योग्य विल्हेवाट न केल्यास गटारे तुंबून घाण पाणी घरात घुसून आरोग्य व स्वच्छतेच्या अनेक समस्या निर्माण होतील, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत मा.पालक मंत्री, पालघर यांनी मागील महिन्यात तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले असूनही अद्याप कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने उक्त कचऱ्याची विल्हेवाट करणेबाबत ग्रामपंचायत कासाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२०-०२-२०२६) :** (१) कचऱ्याच्या ढिगांमुळे अस्वच्छता व दुर्गंधीमुळे आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, अशी बाब नाही.
(२) ग्रामपंचायत कासा अंतर्गत कासा बाजारपेठ, भिसेनगर, पाटील पाडा, वळवी पाडा, गायकवाड पाडा, पोस्ट ऑफिस ही वर्दळीची व बाजारपेठेची ठिकाणे असून त्या ठिकाणी ग्रामपंचायत मार्फत सार्वजनिक कचरा कुंडया ठेवण्यात आलेल्या आहेत. सदर कचरा ग्रामपंचायत मधील दोन घंटागाड्या मार्फत उचलून ग्रामपंचायतने तयार केलेल्या खतखड्‌ड्‌या मध्ये सदर कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येते. त्यामुळे कच-याच्या ढीगांमधील कचरा मोकाट जनावरे खात असल्याने त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे व ग्रामपंचायत हद्दीत कचरा विल्हेवाट सूविधा नाही, अशी बाब नाही.
(३) ग्रामपंचायत कासा मार्फत मान्सूनपुर्व गटार साफसफाई करण्यात आलेली आहे. परंतु दरवर्षी पेक्षा या कालावधी मध्ये जास्त पाऊस असल्याने रस्त्यावर पाणी साठलेले होते. परंतु कोणाच्या घरामध्ये पाणी शिरले नाही किंवा तशी बाब निदर्शनात आलेली नाही. साठलेले पाणी वाहुन जाण्यासाठी ग्रामपंचायत कासा मार्फत जे.सी.बी.ने गटारे व नाले साफ करण्यात आले आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतअंतर्गत रोगराई पसरण्याचा प्रश्न उद्भवलेला नाही.
(४) ग्रुपग्रामपंचायत कासा अंतर्गत "प्लॅस्टिक मुक्त दुर्गंधी मुक्त व स्वच्छ सुंदर पालघर जिल्हा" या विशेष

अभियानाच्या अनुषंगाने प्लॅास्टिक बंदीचा ठराव घेण्यात आला आहे. या अंतर्गत “ग्रामपंचायत हद्दीमध्ये प्लॅस्टीक वापरणे व उघडयावर कचरा टाकल्यांस रु. १,०००/- इतक्या रकमेची दंडात्मक कारवाई करण्यात येईल” असे सूचना फलक लावण्यात आले आहे. त्याप्रमाणे ग्रामपंचायत कासा मध्ये ग्रामस्थांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(५) ग्रामपंचायत कासा हद्दीतील मौजे कासा व मौजे भिसेनगर येथे घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाकरीता ९ खत खड्डे, ६ प्लास्टिक संकलन पिंजरे व २७ शोष खड्डे घेण्यात आले आहेत. तसेच बाजारपेठ व कासा अंतर्गत भिसेनगर, पाटीलपाडा, वळवीपाडा, गायकवाडपाडा, पोस्ट ऑफिस, पार्वती निवास या ठिकाणी कचरा संकलन करण्याकरिता सार्वजनिक कचरा कुंड्यांची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर कचराकुंडीतील कचरा दररोज ग्रामपंचायतीमार्फत घंटागाडी द्वारे उचलण्यात येऊन ग्रामपंचायत हद्दीमध्ये तयार केलेल्या कचरा विलगीकरण केंद्रामध्ये नेण्यात येते व खतखड्यामध्ये कच-याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कर्नाटकातील दावणगिरी जिल्ह्यात होदगिरे या ठिकाणी असलेल्या शहाजीराजे भोसले यांच्या समाधीस्थळाची दुर्दशा झाल्याबाबत

**(११) ७३७२ (०९-१०-२०२५). श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे भोसले यांची समाधी कर्नाटकातील दावणगिरी जिल्ह्यात होदगिरे या ठिकाणी असून त्या समाधीस्थळाची दुर्दशा झाली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी आवश्यक मूलभूत सुविधा नसणे व पर्यटनदृष्ट्या दुर्लक्ष होणे यामुळे ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जपला जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, समाधीस्थळी स्मारक उभारणे, प्रवेश रस्ता, पाण्याची व वीजेची सोय, माहिती फलक, व्याख्यानमालिका व पर्यटकांसाठी सोयी -सुविधा यासारख्या बाबींमध्ये अभाव असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, छत्रपती शिवाजी महाराज यांचे वडील शहाजी भोसले आणि आजोबा मालोजी भोसले यांच्या समाधीस्थळाचा आग्रा येथील नियोजित स्मारकाच्या धर्तीवर विकास करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ एप्रिल, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरशी शासनाने चौकशी करुन शहाजीराजे यांच्या ऐतिहासिक कार्याचा गौरव व्हावा व त्या परिसराचा समग्र विकास व्हावा म्हणून शासनाने कर्नाटक शासनाशी समन्वय साधून या समाधीस्थळाच्या विकासासाठी निधी मंजूर करण्याकरीता कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (१६-०२-२०२६) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

शहाजीराजे समाधी, ता. दावणगिरी, जि. होदगिरे हे भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण बंगलोर मंडळ यांच्या अखत्यारितील राष्ट्रीय संरक्षित स्मारक आहे. या स्मारकाची देखभाल, दुरुस्ती आणि सुरक्षा ही भारतीय पुरातत्व सर्वेक्षणांतर्गत असलेल्या बंगलोर मंडळद्वारा केली जाते.

संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय यांनी सदर स्थळाची पाहणी केली आहे. त्यानुसार या परिसरात लॅण्डस्केपींग, चेन लिंक पध्दतोचे कुंपण, दगडी पदपथ, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, माहिती फलक आदी कामे करण्यात आली आहेत. या स्मारकाची दैनंदिन स्वच्छता व सुरक्षेसाठी एक पहारेकरी व एक दैनंदिन मजुर यांची नेमणुक करण्यात आली आहे.
(४) हे, खरे आहे.
(५) सदर प्रकरणी महाराष्ट्र राज्य, कर्नाटक सरकार आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांच्या समन्वयाने कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

---

**अल्पसंख्याक विभागातील पदभरती व निधी खर्चासंदर्भातील अंमलबजावणीबाबत**

**(१२) ७५३३ (२३-०७-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अल्पसंख्याक विभागात ६०९ पदे मंजूर असून त्यापैकी ६७ टक्के पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अल्पसंख्यांक समाजाच्या उन्नतीसाठी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानापैकी आतापर्यंत फक्त २०% अनुदान खर्च करण्यात आल्याचे सन २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची रिक्त पदे तातडीने भरण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ५ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास उपमुख्य मंत्री तथा वित्त मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१७-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील एकूण रु. ९७४.७६१ कोटी मंजूर तरतूदीपैकी मार्च २०२५ अखेरपर्यंत रु. ६१२.४९ कोटी इतका निधी (अर्थसंकल्पीत तरतूदीच्या ६२.८३४%) खर्च झाला आहे.
(३) होय हे खरे आहे.
(४) रिक्त पदे भरण्याकरीता शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. नवनिर्मित पदांचे सेवाप्रवेश नियम निर्मिती अंतिम टप्प्यात आली आहे. आवश्यकतेनुसार पदे भरण्याकरीता प्रतिनियुक्तीचे धोरण अवलंबिण्यात येत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पद भरती करीता पाठपुरावा करण्यात येत आहे. वर्ग ३ व ४ ची पदे कंत्राटी पध्दतीने बाह्य यंत्रणेद्वारे भरण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगमनेर (जि.अहिल्यानगर) येथील पठार भागातील दरेवाडी येथील कुटुंबाला धर्मांतर करण्याची धमकी दिल्याबाबत**

**(१३) ७६४२ (१९-०९-२०२५). श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर (जि.अहिल्यानगर) येथील पठार भागातील दरेवाडी येथे धर्मांतर करण्यासाठी कुटुंबाला अमिष दाखवून व दबाव आणून देखील यश न आल्याने कुटुंबाला जिवे मारून टाकण्याची धमकी दिल्याची घटना माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पीडित महिलेच्या हातात आरोपीने बळजबरीने धागा बांधून, पाणी शिंपडले, धार्मिक भावना दुखावल्या तसेच या महिलेच्या जावेला देखील धर्म स्वीकार करा नाहीतर तुला नांदू देणार नाही, तुझ्या आई-वडिलांच्या घरी नेऊन ठेवीन अशी धमकी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) सदर गुन्ह्यामधील आरोपीत / प्रतिवादी / गैरअर्जदार यांचेविरुद्ध घारगाव पोलीस ठाणे येथे १) अदखलपात्र गुन्हा रजि.नं. १६६/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३५१(४) प्रमाणे दिनांक २८ मार्च, २०२५ रोजी, २) अदखलपात्र गुन्हा रजि.नं.१६७/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०२, ३५२, ३५१(२), ३५१ (३) प्रमाणे दिनांक २८ मार्च, २०२५ रोजी व ३) अदखलपात्र गुन्हा रजि.नं.१५९/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११५(२), ३५२, ३५१ (३) प्रमाणे दिनांक २४ मार्च, २०२५ रोजी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आलेली आहे.

यातील गैरअर्जदार यांना दिनांक १५ जून, २०२५ रोजी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६८ प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे. तसेच यातील गैरअर्जदार यांचेवर दिनांक २१ जून, २०२५ रोजी चॅप्टर केस क्र.९१/२०२५ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १२६ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

मा. न्यायालयाचे पुर्व परवानगीने सदर अदखलपात्र गुन्ह्याचा तपास करण्यात आला असून, सदर तपासामध्ये असे निष्पन्न झाले की, तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने धर्मांतर अगर ख्रिश्चन धर्म स्विकारावा, हातात धागा बांधणे व पाणी शिंपडणे अशी कोणतीही घटना घडलेली नाही. तक्रारदार यांनी त्यांचे नातेवाईक असलेले गैरअर्जदार यांना त्रास व्हावा याकरिता द्वेषबुद्धीने सदरची तक्रार दिली होती. धर्मांतराबाबत अशी कोणतीही घटना घडलेली नसल्याचे निष्पन्न झालेले आहे.

त्याअनुषंगाने प्रभारी अधिकारी, घारगाव पोलीस ठाणे यांनी दिनांक १५ जुलै, २०२५ रोजी सदर अदखलपात्र गुन्ह्याचा चौकशी अहवाल मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट, संगमनेर, जि. अहिल्यानगर यांना सादर केला आहे.

---

## सांगली जिल्ह्यातील द्राक्ष बागायतदार आर्थिक संकटात असल्याबाबत

**(१४) ७८५३ (२०-०७-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यात अवकाळी पाऊस, ढगाळ वातावरण व ढगफुटी तसेच द्राक्ष व्यापाऱ्यांचे दर पाडणे, कारस्थान करणे व त्यांचे पैसे बुडवून पळून जाण्याचा प्रकार या सर्व संकटामुळे काही वर्षांपासून द्राक्ष शेतीचे दोन हजार कोटी रुपयांपेक्षाही जास्त आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरवर्षी होणाऱ्या या आर्थिक नुकसानीमुळे द्राक्ष बागायतदारांच्या आर्थिक संकटावर मात

करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (१७-०२-२०२६) :** (१) व (२) सांगली जिल्ह्यामध्ये मागील काही वर्षांमध्ये अवकाळी अतिवृष्टी व महापुरामुळे विविध शेतीपिकांचे व फळपिकांचे नुकसान झालेले आहे.

सन २०२५ मध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेती /फळपिकाखालील क्षेत्राचे सर्वेक्षण करुन बाधित शेतकऱ्यांना रक्कम रु.१५२६५.२८ लाख इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

द्राक्ष पिकांचे विमाधारक शेतकऱ्यांना संबंधित वर्षातील विषद ट्रिगर प्रमाणे सन २०२३-२४ मध्ये १८९६ शेतकऱ्यांना द्राक्ष पिकाकरीता एच.डी.एफ.सी. एर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी मार्फत रु.१८.२३ कोटी अदा करण्यात आले आहेत व सन २०२४-२५ मध्ये बजाज अलियान्झ जनरल इन्शुरन्स कंपनी कार्यरत असून मृग बहार २०२४ मध्ये द्राक्ष पिकाकरीता ३९०५ शेतकऱ्यांना रु.१६.५६ कोटी अदा करण्यात आले आहेत.

सांगली जिल्हयातील फळपिकांना देशांतर्गत बाजारपेठ उपलब्ध व्हावी या दृष्टीने विशेष प्रयत्न करून रेल्वे विभाग, कृषि विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नातून दिनांक१९ ऑक्टोबर २०२५ रोजी दर्शन एक्सप्रेसने २४ टन शेतमाल दिल्ली येथील आझादपूर मंडी येथे पाठवण्यात आला आहे.

सांगली पॅटर्न या नावाखाली जिल्हाधिकारी सांगली, कृषि विभाग व अपेडा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५ रोजी "चला शेतकऱ्यांना व्यापारी करुया" या सदराखाली सांगली जिल्ह्यातील निर्यातक्षम उत्पादित्त द्राक्षे व बेदाणे यांना देशांतर्गत व देशाबाहेर बाजारपेठ उपलब्ध होण्याच्या हेतुने Buyer Seller meet आयोजित करण्यात आले आहे.

कृषि विभागांतर्गत सर्व तालुका कृषि अधिकाऱ्यांद्वारे, जिल्हा सांगली कार्यालयामार्फत द्राक्ष पिकांच्या उत्पन्न वाढीसाठी शेतीशाळेचे आयोजन करून तज्ञांचे मार्गदर्शन देण्यात येते.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, राष्ट्रीय कृषि विकास योजना इ. अंतर्गत द्राक्ष पिकांसाठी विविध अनुदाने देण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्हयात नगरपरिषदेला निधी मिळाला नसल्याबाबत

**(१५) ८१२४ (०८-०९-२०२५). श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयात मागील दीड वर्षापासून शहरातील स्वच्छतेचे काम करण्यासाठी नगरपरिषदेला अद्याप निधी उपलब्ध करुन देण्यात आले नसल्याचे दिनांक १७ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी उपलब्ध नसल्याने नगरपरिषद सामान्य फंडातून स्वच्छतेची कामे करवून घेत असल्याने सामान्य फंडाचा निधी खर्च होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०२-२०२६) :** (१), (२) व (३) नगरपरिषद, गडचिरोली यांचेमार्फत घनकचरा व्यवस्थापनाकरिता रु.२.९२ कोटी इतक्या रक्कमेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत (सन २०२५-२६) रु.१.०० कोटी इतक्या रक्कमेच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कृषी विभागाच्या नवीन सुधारित आकृतीबंधाबाबत

**(१६) ८१८० (०८-०९-२०२५). श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदांकडे कृषी अधिकारी (वर्ग-दोन) (कनिष्ठ) पदांसाठी ६४० पदे व विस्तार अधिकारी (कृषी) ८५३ कार्यरत असताना नवीन सुधारित आकृतीबंधात कृषी विभागात कृषी अधिकाऱ्यांची (कनिष्ठ) पदे वाढविल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी विकास अधिकारी हे श्रेणी-१ चे प्रमुख, त्यांच्यासह जिल्हा कृषी अधिकारी (सामान्य प्रशासन) व जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) असे श्रेणी-२ चे तीन अधिकारी तसेच पंचायत समितीत दोन कृषी अधिकारी व तीन विस्तार अधिकारी अशी रचना असतानाही शासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचे दिनांक ३ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या कृषी विभागाच्या तुलनेत जिल्हा परिषदेच्या कृषी अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये दुय्यम स्थान मिळत असल्याने कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी यांच्यासह कर्मचाऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन याबाबत असलेली अस्वस्थता दूर करण्याबाबत तसेच राज्यातील कृषी विभागाच्या नवीन सुधारित आकृतीबंधाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (१७-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) कृषि विभागाचा आकृतीबंध सूधारीत करण्याबाबतचा प्रस्ताव कार्यवाहीत असून सुधारीत आकृतीबंध अद्याप अंतीम झालेला नाही. सदर कार्यवाहीत असलेल्या आकृतीबंधाच्या प्रस्तावात कृषी अधिकारी (कनिष्ठ) संवर्गाची पदे वाढविणे प्रस्तावित केलेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून आरसीएमएस या ऑनलाईन साईटचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१७) ९०३० (१८-०८-२०२५). श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून शिधापत्रिका ऑनलाईन करण्यासोबतच शिधापत्रिका धारकांचे आधार कार्ड सीडिंग करण्यासाठी महत्वपूर्ण असलेल्या आरसीएमएस या ऑनलाईन साईटचे काम संथ गतीने सुरू असल्याने शिधापत्रिकांची विविध प्रकारची कामे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन शिधापत्रिका मिळत नसल्याने नागरिक व विद्यार्थी यांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन आरसीएमएस या ऑनलाईन साईटचे काम लकवरात लवकर पूर्ववत करून नागरिकांना दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ (१७-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) नागरिकांच्या शिधापत्रिका संगणकीकृत करण्याकरीता शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली (RCMS) विकसित करण्यात आली आहे. विभागातील विविध प्रणाली (RCMS, AePDS, IAeSCM) करीता केंद्र शासनाकडून (NGC) क्लाऊड सुविधा घेण्यात आली. हस्तांतरणाची कार्यवाही सुरू असतांना डिसेंबर, २०२४ ते एप्रिल, २०२५ दरम्यान RCMS पोर्टलला तांत्रिक अडचणी येत होत्या. विभागातील प्रणालीचे केंद्र शासनाच्या क्लाऊडवर हस्तांतरण पुर्ण झाल्यानंतर देखील RCMS पोर्टलमधील अहवाल, ई-केवायसी, ई-शिधापत्रिका डाऊनलोड यासंदर्भात तांत्रिक अडचणी येत असल्याने RCMS व AePDS तांत्रिक अडचणीबाबत दिनांक०८.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये NIC, Head Quarter यांना कळविण्यात आले. तसेच, याबाबत संबंधित NGC प्रमुख, NIC प्रमुख व सर्व संबंधित तांत्रिक अधिकारी यांचेशी समन्वय ठेवून तांत्रिक अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला.

सद्यस्थितीत सदर प्रणाली योग्यरित्या कार्यरत आहे. आरसीएमएस या प्रणालीची सेवा विहित मुदतीत शिधापत्रिकाधारकांना देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नंदुरबार जिल्ह्यातील शिधापत्रिका लाभार्थींचे ई-के.वाय.सी. बाबत

**(१८) ९४७७ (१८-०८-२०२५). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या पुरवठा विभागाने शिधापत्रिकांच्या लाभार्थ्यांसाठी ई-के.वाय.सी. सक्तीची केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नंदुरबार जिल्ह्यात किती लाभार्थी ई-के.वाय.सी. साठी पात्र आहेत,
(३) असल्यास, ई-के.वाय.सी. च्या माध्यमातून अपात्र असतांनाही मोफत धान्य घेणाऱ्यांची संख्या जास्त असून या योजनेव्दारे होणाऱ्या गैरप्रकारांना पूर्ण निर्बंध लावणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नंदुरबार जिल्ह्यात किती तोतया शिधापत्रिका धारक सापडले आहेत,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन गैरप्रकारांना रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१७-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) नंदूरबार जिल्ह्यात दिनांक १०.१०.२०२५ पर्यंत १२,६२,६५८ लाभार्थी ई-केवायसी साठी पात्र आहेत.

(३) व (४) केंद्र शासन व सर्वोच्च न्यायालयाकडील आदेशानुसार NFSA योजनेतील लाभार्थ्यांची ई-केवायसी मोहीम राबविण्यात येत आहे. शिधापत्रिका व आधार कार्ड वरील माहितीमध्ये विसंगती असल्यामुळे नंदूरबार जिल्ह्यातील नंदुरबार जिल्ह्यातील ४८७५७ शिधापत्रिकांची ई-केवायसी नाकारण्यात आली आहे. ई-केवायसी नाकारलेल्या लाभार्थ्यांनी त्यांच्या शिधापत्रिका व आधार कार्ड च्या माहितीमधील विसंगती दूर केल्यानंतर सदर ई-केवायसीला मान्यता देण्यात येईल.

(५) विभागाच्या शासन परिपत्रक क्र.शिवाप २०२१/प्र.क्र.०४/नापू-२८, दिनांक ४ एप्रिल, २०२५ अन्वये अपात्र शिधापत्रिका शोध मोहिम नंदूरबार जिल्ह्यात राबविण्यात येत आहे.

---

## कृषी महाविद्यालय (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथील Synthetic Running Track and Football Ground बांधकामाच्या अंदाजपत्रकाला मंजुरी देण्याबाबत

**(१९) ९४९५ (१९-०८-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील कृषी महाविद्यालय Construction of Synthetic Running Track and Football Ground For College of Agriculture, Ambejogai या कामाचे १४१९८३९६/- रुपयांचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी शासनास सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री यांचेकडे दिनांक ०३ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंदाजपत्रकांना किती रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (१८-०२-२०२६) :** (१) असा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) होय.

(३) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषि महाविद्यालय, अंबेजोगाई, जि.बीड येथे Construction of Synthetic Running Track and Football Ground उभारण्याबाबत महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेकडून शासनास अद्याप प्रस्ताव प्राप्त न झाल्याने या अनुषंगाने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी भागातील बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी करावयाची उपाययोजना

**(२०) ९६५३ (३०-०७-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.साजिद**

**पठाण (अकोला पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.राहूल कुल (दौंड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी भागांमध्ये बालमृत्यूचे प्रमाण वाढत असून गेल्या सात वर्षांत तब्बल ११ हजार बालकांचा कुपोषण व आरोग्य विषये सुविधांचा अभाव आणि वेळेवर उपचार न मिळाल्याने मृत्यू झाला असल्याचे निदशर्नास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या सात वर्षांत राज्यातील कोणत्या आदिवासी जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक बालमृत्यू झाले आहेत त्याची जिल्हानिहाय आकडेवारी तसेच मृत्यूची प्रमुख कारणे काय आहेत,

(३) असल्यास, आदिवासी भागांमध्ये बालमृत्यूचे प्रमाण इतके जास्त असण्यामागील नेमकी सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक कारणे काय आहेत,

(४) असल्यास, कुपोषण निर्मूलनासाठी राज्यात कोणती योजना कार्यान्वित आहे आणि तिची अंमलबजावणी कशा प्रकारे केली जात आहे, तसेच,संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास ध्येय धोरणानुसार सन २०३० पर्यंत नवजात मृत्यूदर कमी करण्याचे उद्दिष्ट असून हे उद्दिष्ट शून्यापर्यंत आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, भविष्यात आदिवासी भागातील बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी या भागांमध्ये आरोग्य सुविधांची उपलब्धता आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी विशेष योजना, आरोग्य कर्मचाऱ्यांची उपलब्धता आणि प्रशिक्षण तसेच दुर्गम आणि अतिदुर्गम भागांमध्ये तातडीने आरोग्य सेवा पोहोचविणे याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (१८-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(i) मागील सात वर्षात बाल मृत्युच्या प्रमाणात घट झालेली आहे.

(ii) नवसंजीवनी कार्यक्षेत्रामध्ये सन २०१९ ते सन २०२५-२६ (ऑक्टोबर २०२५ अखेरीस), ० ते ५ वर्षे वयोगटाच्या ७,८६७ बालकांचा विविध कारणांमुळे मृत्यू झालेला आहे.

(iii) सदर बाल मृत्यू प्रामुख्याने मुदतपूर्व जन्म/कमी वजनाची बालके (Prematurity with Low Birth Weight), जंतुसंसर्ग Sepsis), न्युमोनिया (न्युमोनिया), जन्मत: श्वासावरोध (Birth Asphyxia), इत्यादी कारणांनी झालेले आहेत.

(२) गेल्या सात वर्षात राज्यातील नागपूर, ठाणे, पुणे, नाशिक या आदिवासी जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक बालमृत्यू झाले असून जिल्हानिहाय आकडेवारी खालील प्रमाणे आहे:-

आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्र मिळून मागील ७ वर्षात सर्वाधिक बालमृत्यू ( ०-५ वर्षे वयोगट ) असणारे ४ जिल्हे सन २०१९-२० पासून सन २०२५-२६ (ऑक्टोबर अखेर )

| जिल्हा | एकुण बालमृत्यू (०-५ वर्षे वयोगट) |
|---|---|
| नागपुर | ८३७९ |
| ठाणे | ५७३१ |
| पुणे | ५५४२ |
| नाशिक | ४७७२ |

मुदतपूर्व जन्म/कमी वजनाची बालके (Prematurity with Low Birth Weight), जंतुसंसर्ग (Sepsis), न्युमोनिया (न्युमोनिया), जन्मत: श्वासावरोध (Birth Asphyxia) ही बालमृत्युची प्रमुख कारणे आहेत.

(३) आदिवासी भागांमध्ये बालमृत्यूचे प्रमाण जास्त असण्यामागील नेमकी सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक कारणे खालील प्रमाणे आहेत :

(अ) सामजिक कारणे:- (i) कमी वयात लग्न, (ii) बालसंगोपनाबाबत जनतेतील अज्ञान, (iii) जुन्या रुढी परंपरा, (iv) भूमका/परीहार/भगत/मांत्रिक/बुवा इत्यादींवर अंधविश्वास ठेवणे, (v) पालकांची व्यसनाधीनता, (vi) पुरेश्या शिक्षणाचा अभाव, इत्यादी.

(ब) आर्थिक कारणे :- आदिवासी भागात रोजगाराचे प्रमाण कमी असल्यामुळे येथील काही लोकांना मजुरीसाठी आजूबाजूच्या शहरांमध्ये रोजगारासाठी वर्षातील ७-८ महिने स्थलांतरीत व्हावे लागते, रोजगारासाठी वीटभटटीवर काम करणे, गवंडीकाम, शेतमजूरी व समुद्रतटावरील भागात मासेमारी या प्रकारचे रोजगारासाठी घर सोडावे लागते यामुळे विशेषत: लहान बालके व गरोदर माता यांच्या आरोग्याकडे पुरेसे लक्ष देणे त्यांना शक्य होत नाही. दरडोई उत्पन्न कमी असणे,स्वत:ची शेतजमीन नसणे, एकपीक पध्दती,संदर्भ सेवा दिल्यानंतर वैद्यकीय सेवा वगळता इतर खर्चासाठी पैसे नसणे, इत्यादी.

(क) भौगोलिक करणे :- तीव्र उतार व अतिदुर्गम भागात रस्ते व पूल नसणे, सागरी भाग,डोंगरी भाग,गावपाड्यांवर दळणवळणाची सुविधा कमी असणे, पावसाळ्यात संपर्क तुटणारी गावे, इत्यादी.

(४) (अ) महिला व बाल विकास विभाग:- या विभागामार्फत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत कुपोषण कमी करण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येतात:-

(१) पूरक पोषण आहारः- ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना तसेच गरोदर आणि स्तनदा मातांना 'टेक होम रेशन' (THR) दिले जाते. ३ ते ६ वयोगटातील बालकांना अंगणवाडी केंद्रांवर गरम ताजा आहार पुरवला जातो.

(२) नियमित आरोग्य तपासणीः- अंगणवाडी सेविकांमार्फत बालकांची उंची व वजन, तसेच गरोदर मातांचे वजन नियमितपणे घेतले जाते. या नोंदीमुळे त्यांच्या पोषण स्थितीवर लक्ष ठेवणे शक्य होते.

(३) डॉ. भारतरत्न ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना (आदिवासी प्रकल्प):- १६ आदिवासी जिल्ह्यांमध्ये या योजनेअंतर्गत गरोदर आणि स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार दिला जातो. तसेच, ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना आठवड्यातून चार दिवस पूरक आहार दिला जातो. यात शाकाहारी बालकांना दररोज २ केळी आणि मांसाहारी बालकांसाठी १ अंडे देण्यात येते.

(४) सॅम (SAM) बालकांसाठी विशेष उपक्रमः- राज्यातील अति तीव्र कुपोषित (Severe Acute Malnourished - SAM) बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्रे (VCDC) सुरू करण्यात आली आहेत. या केंद्रांमध्ये सॅम बालकांना दिवसातून तीन वेळा एनर्जी डेन्स न्यूट्रिशिअस फूड' (Energy Dense Nutritious Food - EDNF ) पुरवले जाते. आवश्यकतेनुसार आरोग्य विभागामार्फत त्यांना औषधोपचारही दिले जातात. तसेच दुर्धर आजारांनी ग्रस्त असलेल्या सॅम बालकांना आरोग्य विभागाच्या पोषण पुनर्वसन केंद्रांमध्ये (Nutrition

Rehabilitation Centers NRC Centers) दाखल केले जाते. जिथे त्यांना औषधोपचारासोबत विशेष पोषण आहारही दिला जातो.

(५) पोषण अभियान आणि जनजागृती:- पोषण अभियानांतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालके, किशोरवयीन मुली आणि महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी तसेच कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरांवर निरंतर शिक्षण वृद्धी दृष्टिकोन (ILA), समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाइम मॉनिटरिंग (ICT-RTM) आणि जनआंदोलन असे उपक्रम राबवले जात आहेत.

(६) शहरी भागातील कुपोषण नियंत्रण:- शहरी भागातील कुपोषण कमी करण्यासाठी ग्राम बाल विकास केंद्रांच्या धर्तीवर शहरी बाल विकास केंद्रे' (Urban Child Development Centers UCDC) सुरू करण्याबाबत शासनाने ७ जानेवारी २०२५ रोजी निर्देश दिल्यानुसार नागरी बाल विकास केंद्र सुरू करण्यात आलेली आहेत. या UCDC केंद्रांमध्ये दाखल बालकांना EDNF चा पुरवठा सुरू आहे. ज्यामुळे सॅम बालकांवर अधिक प्रभावीपणे लक्ष केंद्रित करून कुपोषण कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

(७) "बाळाचे पहिले सुवर्णमयी १००० दिवस" अभियान:- राज्यातील नागरी व ग्रामीण भागातील कुपोषण कमी करण्यासाठी बाळाच्या आयुष्यातील पहिले "बाळाचे पहिले सुवर्णमयी १००० दिवस" या महत्त्वाच्या टप्प्याविषयी व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. यासाठी तयार करण्यात आलेली मार्गदर्शक पुस्तिका शासनाच्या सर्व विभागांमध्ये वितरित करण्यात आली आहे, ज्याद्वारे संबंधित विभागांना या १००० दिवसांचे महत्त्व प्रसारित करण्याची विनंती करण्यात आली आहे. या आयुक्तालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांना, तसेच जिल्हा व प्रकल्प स्तरावर सदर पुस्तिकेचे वाटप करण्यात आले आहे. यासोबतच, पर्यवेक्षिका आणि अंगणवाडी सेविकांना पालकांमध्ये, गरोदर महिलांमध्ये आणि स्तनदा मातांमध्ये 'पहिल्या १००० दिवसांचे महत्त्व पोहोचवण्याचे निर्देश दिले आहेत.

(ब) सार्वजनिक आरोग्य विभाग :- या विभागामार्फत नवजात मृत्युदर शून्यापर्यंत आणण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना:-

विशेष नवजात शिशु काळजी कक्ष - Special New Born Care Unit (SNCU), नवजात शिशु स्थिरीकरण कक्ष - (New Born Stabilization Unit (NBSU), नवजात शिशु कोपरा (NBCC), कॅाम्प्रिहेन्सिव्ह लॅक्टेशन मॅनेजमेंट सेंटर (सीएलएमसी), बालमृत्यू अन्वेषण,घरच्या घरी नवजात शिशुची काळजी (HBNC) जोखीमग्रस्त कार्यक्षेत्रातील आशांमार्फत अतिसार, न्युमोनिया व सेप्सीस या आजारांचे व्यवस्थापन, Social Awareness and Action to Neutralize Pneumonia Successfully (SAANS),"मा" - Mother Absolute Affection (MAA),राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम,स्टॅाप डायरिया कॅम्पेन (Stop Diarrhoea Campaign), ॲनिमिया मुक्त भारत, नियमित लसीकरण तसेच नवजात मृत्यू दर शून्यापर्यंत आणण्यासाठी माता आरोग्य संबंधित राबविण्यात येणाऱ्या योजना- जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, मानव विकास कार्यक्रम, संस्थात्मक प्रसूतीसाठी प्रोत्साहन, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, वात्सल्य कार्यक्रम, अति जोखमीच्या मातांचे व्यवस्थापन, इत्यादी.

संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास ध्येय धोरणानुसार २०३० पर्यंत नवजात मृत्युदर १२ पर्यंत करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून SRS -२०२३ च्या अहवालानुसार राज्याचा नवजात मृत्युदर ११ आहे. यानुसार राज्यामध्ये २०३० चे सदर उद्दीष्ट सन २०२० मधेच साध्य केले आहे.

(५) राज्यातील आरोग्य सुविधांची उपलब्धतता आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी आदिवासी भागातील प्रति २०,००० लोकसंख्येमागे १ प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रति ३००० लोकसंख्येमागे १ उपकेंद्र स्थापन केले जाते.

(A) नवसंजीवनी कार्यक्षेत्रामध्ये खालील प्रमाणे आरोग्य सेवांची उपलब्धता आहे:-

(i) नवसंजीवनी कार्यक्षेत्रामध्ये १९१८ उपकेंद्रे, ३६८ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ७३ ग्रामीण रुग्णालये, १७

उपजिल्हा रुग्णालये, २६१ कार्यरत भरारी पथके, १०२ च्या ५८९ रुग्णवाहिका, १०८ च्या १४४ रुग्णवाहिका, CSR देणगी मधून प्राप्त ७४ रुग्णवाहिका आहेत.

(ii) Trauma Care Center सुविधा: १६ आदिवासी जिल्हयांमध्ये ३० खाटांची २०७ रुग्णालये आहेत. १४ आदिवासी जिल्हयांत (अहिल्यानगर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, जळगाव, नागपूर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, पुणे, रायगड, ठाणे, यवतमाळ) ४० Trauma Care Center कार्यान्वित आहेत.

(iii) CT Scan सुविधा: १६ आदिवासी जिल्हयांमध्ये ९२ आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन झालेले आहे. १६ आदिवासी जिल्हयात ३१ आरोग्य संस्थांमध्ये CT Scan सुविधा उपलब्ध आहेत.

(iv) MRI सुविधा: तसेच जिल्हा रुगणालय ठाणे, पालघर, पुणे, नाशिक, अहिल्यानगर, धुळे, नंदुरबार, अमरावती, नांदेड, नागपूर या ठिकाणी MRI सुविधा उपलब्ध आहे.

(B) रक्त उपलब्धता: १६ आदिवासी जिल्ह्यांमध्ये २०६ रक्त पेढी, ८५ कार्यरत रक्त साठवणूक शित केंद्र आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषानुसार रक्त संकलन हे लोकसंख्येच्या १ टक्का असायला हवे तथापि, आदिवासी जिल्ह्यातील रक्त संकलन हे निकषापेक्षा जास्त आहे. तसेच रक्ताअभावी माता मृत्यू व बाल मृत्युचे प्रमाण कमी व्हावे म्हणून आदिवासी भागात रक्त साठवणूक केंद्र कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. तसेच अकार्यान्वित रक्त साठवणूक केंद्रे असल्यास ते तातडीने सुरू करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांना सूचित करण्यात आलेले आहे. सामाजिक संस्था, धर्मादाय संस्था यांनी आदिवासी भागात रक्त केंद्रे स्थापित करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र मागितल्यास ते प्राधान्याने दिले जाण्याचे राज्य रक्त संक्रमण परिषदेचे धोरण आहे.

(C) आरोग्य सुविधांची गुणवत्ता: आरोग्य सुविधांची गुणवत्ता वाढविण्यासाठी दरवर्षी कायाकल्प, लक्ष्य, मुस्कान, सुमन, गुणवत्ता व आश्वासन या कार्यक्रमांतर्गत आरोग्यसंस्था, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षण, मार्गदर्शन व मुल्यांकन करण्यात येते.

(D) आरोग्य कर्मचाऱ्यांची उपलब्धतेबाबत:

(१) आदिवासी जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकारी गट अ (एस-२०) यांची ४७१९ पदे मंजूर असून ४१९५ पदे भरलेली (भरलेली-३२६१, बंधपत्रित- १०८, कंत्राटी-८२६) आहेत.

(२) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत, माहे जुलै, २०२५ मध्ये, १६ आदिवासी जिल्ह्यात एकूण १७०६० पदे मंजूर आहेत व त्यापैकी १४००६ पदे भरलेली असून ३०५४ पदे रिक्त आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार सन २०२४-२५ मधील मंजूर पदांपैकी रिक्त असलेली पदे तात्काळ भरण्याकरिता राज्यस्तरावरून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या दिनांक १९ जानेवारी, २०२४ दिनांक ११ फेब्रुवारी, २०२५ व दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजीच्या पत्रान्वये विविध स्तरावरील विविध संवर्गातील रिक्त असलेली पदे विशेष मोहीम राबवून भरण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर पदभरती पूर्ण करण्याच्या दृष्टीने राज्यस्तरावरून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करण्यात येत असून रिक्त पदांची पदभरती करणेबाबत त्याचा नियमितपणे राज्यस्तरावरून पाठपुरावा करण्यात येत आहे.

(E) नवसंजीवनी कार्यक्षेत्रातील रिक्त पदांची स्थिति खालील प्रमाणे आहे:-

नवसंजीवनी कार्यक्षेत्रातील रिक्त पदांची स्थिती (माहे ऑक्टोबर २०२५)

| पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ व ३ | ८४० | ७५५ | ८५ |
| मानसेवी वैद्यकीय अधिकारी | २८० | २६१ | १९ |

| | | | |
|---|---|---|---|
| आरोग्य सहायक पुरुष | ६३२ | ५८६ | ४६ |
| आरोग्य सहाय्यक स्त्री | ४३४ | ३८० | ५४ |
| बहु उद्देशीय आरोग्य कर्मचारी पुरुष | १८२१ | १४५६ | ३६५ |
| बहु उद्देशीय आरोग्य कर्मचारी स्त्री | २७७९ | १७५८ | १०२१ |

(F) मेळघाट व नंदुरबार जिल्ह्यात स्त्रीरोगतज्ञ व बालरोगतज्ञ यांची प्रतिनियुक्ती:-

बालमृत्यूचे प्रमाण कमी करावयाचे अनुषंगाने मेळघाट तसेच नंदुरबार तेथील आरोग्य संस्थांमध्ये दिनांक १० जानेवारी, २०२२ पासून प्रत्येकी १५ दिवसांच्या कालावधीकरीता आयुक्तालयस्तरावरुन मेळघाट तसेच नंदुरबार येथे स्त्रीरोगतज्ञ व बालरोगतज्ञ यांचे प्रतिनियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत. त्यानुसार मेळघाट मध्ये आयुक्तालयाचे पत्र क्र. आसेआ/पीआयएल-१३३ ऑफ २००७/मेळघाट/प्रतिनियुक्ती बावत/२९०२/२५, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ अन्वये व नंदुरबार मध्ये आयुक्तालयाचे पत्र क्र. नंदुरबार जिल्हा/प्रतिनियुक्ती बावत/२८१७/२५, दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ अन्वये स्त्रीरोगतज्ञ व बालरोगतज्ञ यांचे प्रतिनियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(G) प्रशिक्षण:-

पावसाळापूर्व सुसज्जतेबाबत दिनांक ०६ मे, २०२५ रोजी राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर यांचे मार्फत प्रशिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात आलेले आहे. यामध्ये प्रा. आ. स्तर वैद्यकीय अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, इ. चे प्रशिक्षण झाले असून सदर प्रशिक्षकांनी आदिवासी जिल्ह्यामधील इतर कर्मचारी यांना प्रशिक्षित केलेले आहे.

(H) दुर्गम आणि अतिदुर्गम भागांमध्ये तातडीने आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी खालील प्रमाणे उपाय योजना करण्यात आलेल्या आहेत:-

सन २०२४ च्या लोकसंख्येनुसार दुर्गम व अतिदुर्गम भागामध्ये अतिरिक्त आरोग्य संस्था निर्माण करण्याकरिताचा जोडबृहत आराखडा शासनास सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(I) भरारी पथक:-

राज्यातील आदिवासी भागातील अतिदुर्गम /आदिवासी / संवेदनशील भागामध्ये अंदाजे किमान ८-१० गावांकरीता एक पथक याप्रमाणे कार्यरत आहेत . प्रत्येक पथकामध्ये १ मानसेवी डॉक्टर, २ आरोग्य कर्मचारी असतात. भरारी पथक हे आदिवासी व दुर्गम भाग ज्या ठिकाणी आरोग्य सुविधा पोहचविण्यामध्ये अडचणीचे ठरते, जे ठिकाण आरोग्याच्या दृष्टीकोनातून अतिसंवेदनशील आहे, माता व बालमुत्यू जास्त प्रमाणात होतात, कुपोषित बालकांची संख्या जास्त प्रमाणात आहेत. विविध साथीचे आजार उदा. अतिसार, हिवताप उद्भवतात, ज्या ठिकाणी आरोग्य संस्था नाहीत अशा २७४५ दुर्गम आदिवासी गावासाठी भरारी पथके कार्यरत आहेत.

(J) माहेर घर:-

माहेर घर ही योजना नवसंजीवनी कार्यक्षेत्रातील, ज्या भागात दळण वळणाची साधने नाहीत, अति दुर्गम भाग आहे, जिथे घरी प्रसूती होण्याचे प्रमाण अधिक आहे, अशा ठिकाणच्या गरोदर मातांना संस्थात्मक व सुरक्षित प्रसुतीसाठी माहेर घर योजनेचा लाभ देण्यात येत आहे.

(K) आशा कार्यकर्ती यांना आपत्कालीन परिस्थितीत परिवहन निधी :-

गरोदर मातेस प्रसुतीसाठी दरम्यान १०२/१०८ मोफत रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्यास मातेला रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी आशा कार्यकर्तींना (नमुनात्मक रक्कम रुपये १०००/-) निधी देण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

## परभणी शहरातील महानगरपालिकेतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२१) १००१४ (१५-०७-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहर महानगरपालिकेत गट अ ते गट ड या संवर्गातील सुमारे २९० पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदांमध्ये मुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढला असून महापालिकेची आर्थिक स्थिती सक्षम नसल्याने नवीन पदभरतीस अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परभणी महापालिकेसाठी पुरेसे कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०२-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) परभणी शहर महानगरपालिकेकरिता दिनांक २८.५.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एकूण ७६२ पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला असून सद्यस्थितीत त्यापैकी ४७२ पदे भरलेली असून २९० पदे रिक्त आहेत.
शासन निर्णय दिनांक ४.५.२००६ अन्वये महानगरपालिकेंचा आस्थापना खर्च ३५ टक्के पर्यंत असणे अपेक्षित आहे. तथापि, परभणी शहर महानगरपालिकेचा सद्यस्थितीत आस्थापना खर्च ६४ टक्के इतका आहे

शासन निर्णय, नगर विकास विभाग, दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ अन्वये सन २०२३ च्या पदभरतीसाठी सर्व महानगरपालिकेंकरिता एक वेळची बाब म्हणून मनपा आस्थापना खर्चाच्या ३५ टक्के मर्यादेची अट शिथील करणेबाबत निर्णय घेण्यात आला होता.

त्यानुसार, आयुक्त, परभणी शहर महानगरपालिका यांनी शासनाकडे केलेल्या मागणीनुसार परभणी महानगरपालिकेतील विविध संवर्गातील एकूण ५८ पदांची भरती प्रकिया करण्यास दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यता देण्यात आली, तथापि,महानगरपालिकेचा आस्थापना खर्च ६४% असल्याने महानगरपालिकेकडून नवीन पद भरती करण्यात आलेली नाही.

मालमत्तांचे फेरमुल्यांकन करून मालमत्ता करातील वाढीमधून उत्पन्नात वाढ होणेकरिता महानगरपालिकेकडून प्रयत्न करण्यात येत आहेत.

सद्य:स्थितीत उपलब्ध अधिकारी / कर्मचारी व बाह्यस्त्रोत यंत्रणेवरील कर्मचारी यांचेकडून मनपाचे दैनंदिन प्रशासकीय कामकाज करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे मसलगा (ता.औसा) येथील भूकंप पुनर्वसित गावातील घरांचे मालकी प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**(२२) १०३७७ (२०-०७-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मसलगा (ता.औसा) येथील सन १९९३ च्या भुकंपामुळे उध्वस्त झालेल्या गावाचे पुनर्वसन केले असून त्यापैकी इतर गावातील उध्वस्त झालेली परंतु निकषात न बसणारी वांगजीसह इतर गावातील जमिनी प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या नावे असल्याने उक्त गावातील नागरिकांना त्यांच्या घरांचे मालकी प्रमाणपत्र मिळत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातील पुनर्वसनातंर्गत बांधलेली भोगवट्यातील घरे मालकी हक्कात घेण्याबाबत तसेच सदरील गावात मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी गावठाण म्हणून घोषित करण्याबाबत आणि मालकी हक्क प्रमाणपत्र वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) (१८-०२-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
मौजे मसलगा खु., ता. औसा जि. लातूर हे गाव सन १९९३ च्या भूकंपामध्ये उध्वस्त झाल्याने या गावाचे पुनर्वसन साधु वासवाणी मिशन, पुणे यांचे मार्फत ६ शेतक-यांच्या जमीनी ठराव पत्राआधारे घेऊन पुनर्वसन करण्यात आलेले आहे. तसेच, सदरील प्रकरणात मौजे मसलगा खु. या गावाचे पुनर्वसन करण्यासाठी साधु वासवाणी मिशन, पुणे यांनी १ ते ०६ शेतक-यांच्या जमीनी १० रुपयांचे स्टॅम्प पेपरवर सन १९९४ मध्ये अनोंदणीकृत ठरावपत्र करुन घेतले आहे. याच जमीनीवर सदर संस्थेमार्फत भूकंप पुनर्वसनातंर्गत लाभार्थ्यांना ९१ घरे बांधुन दिली आहेत. परंतु आजरोजी ७/१२ वर मुळ शेतक-यांची नावे आहेत. त्यामुळे सदरील गावातील लाभार्थ्यांना आजतागायत घराचे मालकी प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेले नाहीत.

मौजे मसलगा खु., ता. औसा जि. लातूर येथील भूकंप पुनर्वसना अंतर्गत लाभार्थ्यांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध नसल्याने तत्कालीन सरपंच, उपसरपंच यांचे स्वाक्षरीने मौजे मसलगा खु. येथील ९१ कुटूंब प्रमुखांची यादीची छायाप्रत उपलब्ध करुन घेतली आहे. त्यातील कांही लाभार्थी यांचेकडुन नोंदणीकृत खरेदी खताआधारे जमीन खरेदी केलेले दिसून येत आहे. सदर जमीनीवर साधु वासवाणी मिशन, पुणे यांनी पुनर्वसनातंर्गत घराचे बांधकाम करुन दिलेले आहे.

मौजे मसलगा खु. येथील सन १९९३ चे ग्रामपंचायत कार्यालयाचे नमुना नं-८ उपलब्ध नाही तथापी या गावाचे सन २००० चे ग्रामपंचायत कार्यालयाचे गाव नमुना नंबर ८ चे रजिस्टर उपलब्ध झालेले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या आदेशान्वये तहसीलदार, औसा यांचे अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर तालुका स्तरीय समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(२) प्रकरणात तहसीलदार, औसा यांनी उपविभागीय अधिकारी औसा-रेणापूर यांचे मार्फत मौजे मसलगा खु. या गावचे गावठाण घोषीत करणे बाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना सादर करण्यात आला आहे. सदर प्रकरणात जिल्हाधिकारी, लातूर यांच्यामार्फत छाननी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्हापरिषद सर्व विभाग कार्यालयामध्ये शासकीय कर्मचारी यांची नियमबाह्य बदली व प्रतिनियुक्तीबाबत

**(२३) ११०३४ (२५-०९-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हापरिषद सर्व विभागातील कार्यालयामध्ये काही कर्मचारी सातत्याने एकाच ठिकाणी गेल्या अनेक वर्षापासून कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या नियमानुसार त्यांची बदली इतरत्र होणे गरजेचे आहे मात्र बदली झाल्यावरही सदर कर्मचारी प्रतिनियुक्तीच्या आधारे पुन:श्च त्याच विभागात किंवा त्याच टेबलवर कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियमबाह्य प्रतिनियुक्ती अथवा एकाच कार्यालयामध्ये अनेक वर्ष कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची नावानिहाय, तपशीलवार यादी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे स्थानिक प्रशासनाकडे मागवलेली आहे मात्र अद्यापपर्यंत कोणतीही माहिती मिळालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी अशा होत असलेल्या अनियमततेची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी चौकशीची मागणी केली आहे काय तसेच उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२०-०२-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) सदर प्रकरणी लोकप्रतिनिधीकडुन जिल्हा परिषद बीड कार्यालयाकडे चौकशी संदर्भात मागणी करण्यात आलेली नाही.

जिल्हा परिषद बीड अंतर्गत सन २०२५ च्या सर्वसाधारण बदल्या दिनांक १५ मे, २०२५ रोजी समुपदेशनाद्वारे करण्यात आलेल्या आहेत. तसेच सन २०२५ करिता स्थानांतर बदल्या प्रस्तावित आहेत. तसेच सदयस्थितीत जि.प. बीड यांच्या कार्यालयात एकही कर्मचारी प्रतिनियुक्तीने कार्यरत नाही. तथापि, कर्मचाऱ्यांच्या अनुभवानुसार प्रशासकीय दृष्टीकोणातून संबंधिताचा मुळ कार्यभार सांभाळून अतिरिक्त कार्यभार जिल्हा परिषदेने दिलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिधापत्रिका धारकांच्या शिधापत्रिकेस आधारकार्ड लिंक करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना करण्याबाबत

**(२४) ११०५६ (१८-०८-२०२५). श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेशनकार्डला आधार क्रमांक लिंक करण्यासाठी केंद्र शासनाने ई-केवायसी मोहिम राबविली असून रेशनकार्ड धारकांनी ई-केवायसी न केल्यास रेशनकार्ड रद्द करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात १ कोटी ६५ लाख ३३ हजार रेशनकार्डधारकांनी दिनांक ३० एप्रिल, २०२५ पर्यंतची मुदत संपूनही ई-केवायसी केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात ई-केवायसी केलेल्या कागदपत्रांच्या छाननीनंतर तब्बल १७ लाख ९५ हजार ५५३ रेशनकार्ड विविध कारणास्तव रद्द करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन राज्यातील जनतेला शिधापत्रिकेमार्फत मिळणारे शासकीय फायदे मिळण्याच्या दृष्टीने सर्व शिधापत्रिका धारकांच्या शिधापत्रिकेस आधारकार्ड लिंक करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१७-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतील सर्व लाभार्थ्यांची ई-केवायसी पडताळणी करण्याचा सुचना मा. सर्वोच्च न्यायालय व केंद्र शासनाने दिल्या आहेत. त्यानुसार राज्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांची

रास्तभाव दुकानस्तरावर ई-केवायसी मोहिम राबविण्यात सूचना क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत. तथापि, ई-केवायसी न केल्यास शिधापत्रिका रद्द करण्यात आलेल्या नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. राज्यातील १७,९५,५५३ लाभार्थ्यांची शिधापत्रिकेमधील माहिती आधार प्रणालीसोबत जूळून न आल्याने सदर लाभार्थ्यांची ई-केवायसी रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच नमूद करण्यात येत की, सदर १७,९५,५५३ लाभार्थ्यांच्या शिधापत्रिका रद्द करण्यात आल्या नसून त्यांची ई-केवायसी रद्द करण्यात आली आहे. सदर लाभार्थ्यांनी आधार प्रणालीवरील माहितीप्रमाणे त्यांची बायोमेट्रिक माहिती शिधापत्रिकेमध्ये अद्ययावत करून ई-केवायसी केल्यास त्याची ई-केवायसी पडताळणी पुर्ण करता येईल.
(४) राज्यातील शिधापत्रिकामध्ये आधार संलग्न करण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयांना दिनांक २७ जुलै, २०२५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील सन २०२० च्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना पिक विमा योजनेचे पैसे देण्याबाबत

**(२५) ११०५९ (०८-०९-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सन २०२० च्या खरीप हंगामात पंतप्रधान पिक योजनेच्या माध्यमातून पिक विमा योजनेचे पैसे भरुन या योजनेत नाव समाविष्ट केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२० मध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शासनाने पिकांचे संयुक्त पंचनामे करुन तशा याद्या संबंधित कार्यालयाकडे पाठविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच अद्यापही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिक विमा योजनेचे पैसे देण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना पिक विमा योजनेचे पैसे देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (१७-०२-२०२६) :** (१) होय.
(२), (३) व (४) खरीप हंगाम, २०२० मध्ये एनडीआरएफ अंतर्गत राज्य शासनाने केलेल्या पंचनाम्यांच्या आधारे पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

खरीप, २०२० च्या हंगामात एनडीआरएफ अंतर्गत करण्यात आलेल्या पंचनाम्यांच्या आधारे दयावयाच्या पीक विमा भरपाई संदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने पात्र शेतकऱ्यांना काही प्रमाणात नुकसान भरपाई देणे प्रलंबित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वन विभागामार्फत काढण्यात येणाऱ्या कुंपणाच्या निविदांमध्ये विशिष्ट ब्रांडचा संदर्भ न देण्याबाबत**

**(२६) ११३२८ (०८-०९-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाच्या कुंपणाच्या निविदांमध्ये बेल्जियममधील बेकार्ट कंपनीच्या मालकीच्या ट्रेडमार्क असलेले "बेझिनल २०००" या झिंक-ॲल्युमिनियम मिश्रणाचा लेप (कोटिंग) अनिवार्य करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका विशिष्ट कंपनीचे बेझिनल २००० उत्पादन असल्यामुळे इतर भारतीय कंपन्यांना निविदा प्रक्रियेत सहभाग घेता येत नसून त्यातून आयात केलेल्या उत्पादनांची मक्तेदारी तयार होऊन मेक इन इंडिया उपक्रमाला व स्थानिक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाच्या वाढीला अडचण येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त प्रकारचा संदर्भ देण्यात येऊ नये, अशा प्रकारची मागणीही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (१६-०२-२०२६) :** (१) वन विभागाच्या अधिनस्त सर्व प्रादेशिक व वन्यजीव वनवृत्त कार्यालयाद्वारे कुंपणाच्या निविदांमध्ये बेल्जियम मधील बेकार्ट कंपनीच्या मालकीच्या ट्रेडमार्क असलेले बेझिनल २००० या झिंक- ॲल्युमिनियम मिश्रणाचा लेप (कोटिंग) अनिवार्य करण्यात आलेले नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात रासायनिक खतांचे दर नियंत्रणात व बिटी बियाणांच्या किंमती कमी करुन शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत**

**(२७) ११८०१ (२१-०७-२०२५). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) : तारांकित प्रश्न क्रमांक २५६ ला दिनांक ६ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जागतिक बाजारात कच्च्या मालाचे दर वाढल्याने कंपन्यांनी रासायनिक खतांच्या दरात प्रति बॅग (५० किलो) २४० ते २४५ रुपयांनी वाढ केली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्य शासनाने खतावरील अनुदान बंद केल्यामुळे रासायनिक खतात दरवाढीचा फटका शेतकरी व शेतीवर अवलंबून असलेल्या नागरिकांवर तसेच उत्पादन खर्चातील वाढ, आर्थिक फटका, शेतीवर, अर्थव्यवस्थेवर तसेच (युरिया, डीएपी, पोटॅश) प्रति बॅग या सर्वांवर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होऊन शेतमालाला कमी दर मिळाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आले असून रासायनिक खतांवर ६० ते ७० टक्के दरवाढ, तर बिटी बियाणे तसेच किटकनाशकांचेही दर ५ ते २० टक्क्यांनी दरवाढ झाल्याचे माहे एप्रिल-मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच खरीप हंगामात शेतकऱ्यांना दर्जाहीन बियाणे, जास्त भावाने खते विक्री यामधून शेतकऱ्यांची होणारी

फसवणूक रोखण्याकरीता या विक्रेत्यांवर कारवाई करण्याची मागणी कृषी अधिकाऱ्यांना (अमरावती) निवेदन देऊन माहे मे, २०२५ मध्ये करण्यात आली तसेच तालुकास्तरिय भरारी पथकाची स्थापना करण्याची मागणीही शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन रासायनिक खतांचे दर नियंत्रणात व बिटी बियाणांच्या किंमती कमी करुन शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (१५-१२-२०२५) :** (१) माहे जानेवारी २०२५ पासून N:P:K १०:२६:२६, N:P:K १२:३२:१६ या खतांच्या किंमती मध्ये रु.२५५ पर्यंत वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. माहे मे २०२५ व त्यादरम्यान खतांच्या किंमतीमध्ये कोणतीही दरवाढ झालेली नाही.

(२) खतांच्या किंमती व त्यावरील अनुदान ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असल्यामुळे त्यावर राज्य शासनाकडून निर्णय होत नाही.

(३) केंद्र शासनाने बी टी कापूस वियाणे दरात सन २०२४-२५ च्या तुलनेत सन २०२५-२६ मध्ये ४.२८ टक्क्यांनी वाढ केली आहे. किटकनाशकांच्या दरांचे नियंत्रण केंद्र शासन अथवा राज्य शासनाकडून केले जात नाही.

(४) होय.

राज्यात खरीप हंगाम २०२५ मध्ये शेतकऱ्यांना दर्जेदार कृषि निविष्ठा रास्त दराने व मुबलक प्रमाणे उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कृषि आयुक्तालयात विशेष नियंत्रण कक्ष तसेच विभागस्तर, जिल्हास्तर व तालुका स्तरावर ९९५ भरारी पथके स्थान करण्यात आलेली आहेत. तसेच कृषि निविष्ठांचे विक्रीमध्ये काळाबाजार होणार नाही याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) अनुदानित खतांच्या किंमती कमी व्हाव्यात यासाठी खतांच्या किंमती वरील GST माफ करण्याबाबत केंद्र शासनास दिनांक ११ फेब्रुवारी, २०२५ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

बीटी कापूस बियाण्याचे दर हे केंद्र सरकार निश्चित करत असते

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात शासनाने आईचे नाव लावण्याचा शासन निर्णय काढला असून विवाहित महिलांना आईचे नाव लावण्यास अडचणी येत असल्याबाबत

**(२८) ११८४० (०७-०८-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ एप्रिल, २०२४ नंतर जन्मलेल्या बालकांच्या नावाच्या पुढे आधी त्याचे आणि नंतर आईचे व नंतर वडिलांचे नाव आणि आडनाव लिहिले जाईल, असा आदेश शासनाने काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक लोकप्रतिनिधी, मुख्यमंत्र्यांपासून सर्व मंत्री व अधिकाऱ्यांनी या निर्णयात आईचा सन्मान असल्याने स्वतःच्या नावासमोर आईच्या नावाचा उल्लेख असलेल्या पाट्या वापरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विवाहित महिलांना अनेक अडचणी येत असून याबाबत शासनाने योग्य ती स्पष्टता आणावी यासाठी महिला लोकप्रतिनिधींनी विधानसभेत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१८-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) दिनांक ०१ मे, २०२४ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तींना शासकीय दस्तऐवजांमध्ये आईच्या नावाचा समावेश वेगळया स्तंभामध्ये न दर्शविता उमेदवाराचे नांव आईचे नाव नंतर वडिलांचे नाव आडनाव अशा स्वरुपात नोंदविण्याचे बंधनकारक करण्यास शासन निर्णय दिनांक १४ मार्च, २०२४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

विवाहित स्त्रियांच्या बाबतीत सध्या अस्तित्वात असलेल्या पध्दतीनुसार त्यांच्या विवाहानंतरचे म्हणजे तिचे नाव नंतर तिच्या पतीचे नाव व आडनाव अशा स्वरुपात नाव नोंदविण्याची प्रक्रिया सुरु ठेवण्यात यावी. तसेच स्त्रीला विवाहपूर्वीच्या नावाने मालमत्तेच्या दस्तऐवजामध्ये नोंदविण्याची मुभा ठेवण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पीएमआरडीए, पीसीएमसी च्या माध्यमातून पिंपरी-चिंचवडमधील अंतर्गत व मुख्य रस्त्यांच्या कनेक्टिव्हीटीबाबत

**(२९) ११८६८ (०८-०९-२०२५). श्री.महेश (दादा) किसन लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील राष्ट्रीय महामार्ग आणि अंतर्गत मुख्य रस्त्यांवर चाकण, रांजणगाव, तळेगाव, हिंजवडी अशा औद्योगिक व आयटी पट्ट्यातील तसेच चाकण ते पिंपरी-चिंचवड या १० ते १२ किमी अंतरासाठी नागरिकांना २ ते २.३० तास वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे मे, २०२५ निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे-नाशिक महामार्गावर प्रस्तावित एलिव्हेटेड कॉरिडॉर, तळेगाव- शिक्रापूर रस्ता यासह इनर रिंगरोडचे काम गतिमान करणे आवश्यक असून अंतर्गत मुख्य रस्ते आणि महामार्ग यांच्या "मिसिंग लिंक" पूर्ण करुन वाहतूक सक्षमीकरणाबाबत कृती आराखडा तयार करण्याची शासनाकडे मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पिंपरी-चिंचवडमधील अंतर्गत व मुख्य रस्त्यांची कनेक्टिव्हीटी वाढवण्यासाठी पीएमआरडीए, पीसीएमसी, जिल्हा परिषद हद्दीतील भूसंपादनाचा प्रश्न मार्गी लावून तसेच रस्त्यांच्या कामासाठी निधी उपलब्ध करून सदर कामे तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१२-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विविध योजने अंतर्गत वर्तुळाकार मार्ग प्रकल्प (८३.१२ कि.मी), प्राधिकरण क्षेत्रातील CMP अंतर्गत CTTS/IIP मधील सूचवलेली कामे-मिसिंग लिंक-रस्ते (८.१० कि.मी.), पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील क्षेत्रातील अर्बन ग्रोथ सेंटर कनेक्टीव्हीटी विकसित करणे (९०.०० कि.मी.), पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील क्षेत्रातील बाह्य वर्तुळाकार मार्ग कनेक्टिव्हिटी विकसित करणे (१२.१० कि.मी.) प्राधिकरण क्षेत्रातील ५९.९३ कि.मी. इंडस्ट्रीयल कॉरीडॉर कनेक्टिव्हीटी इत्यादी रस्ते विकसित करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील NHAI मार्फत प्रस्तावित नाशिक फाटा ते राजगुरुनगर (खेड) (NH ६०) Elevated Corridor च्या Approach Ramps करीता १०५ हेक्टर भूसंपादन प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील जागेच्या भूसंपादनाची कार्यवाही सुरु असून शहरातील डि. पी रस्त्यावरील मिसींग लिंक व अंतर्गत रस्ते उपलब्ध निधीमधून टप्याटप्याने विकसीत करणेत येत आहेत.

---

## दामपुरी (ता.गंगाखेड, जि.परभणी) साठवण तलाव प्रकल्प गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याबाबत

**(३०) ११८९८ (१९-०९-२०२५). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दामपुरी (ता.गंगाखेड, जि.परभणी) साठवण तलाव प्रकल्प गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त साठवण तलावास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र उपलब्ध असून सदरील कामाचे अंदापत्रक जलसंधारण विभागास प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प हा डोंगराळ भागातील असल्याने या भागातील पाणी टंचाईचा प्रश्न मार्गी लागून दुष्काळी क्षेत्र कमी होण्यास मदत होणार असल्याने या योजनेला प्राधान्याने मुख्यमंत्री १०० दिवस कार्यक्रम अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०२-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) दिनांक ०६.०३.२०२५ च्या पत्रान्वये प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावास मान्यतेपूर्वी नियोजन व वित्त विभागाचे अभिप्राय अपेक्षित असल्याने प्रस्ताव अभिप्रायासाठी सादर करण्यात आलेला आहे. अभिप्रायाअंती व विभागाच्या उपलब्ध निधीचा विचार करुन प्रशासकीय मान्यतेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जोतिबा गिरजवडे (ता.शिराळा, जि.सांगली) ते जोतिबा (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) या प्रमुख जिल्हा मार्गास दर्जान्नती देणे प्रलंबित असल्याबाबत

**(३१) ११९१३ (२३-०८-२०२५). श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोतिबा गिरजवडे (ता.शिराळा, जि.सांगली) ते जोतिबा (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) या गावांच्या लोकसंख्येचा रस्त्याचा होणारा वापर लक्षात घेता या प्रमुख जिल्हा मार्गाचे राज्य मार्ग म्हणून दर्जान्नती करणेबाबतचा प्रस्ताव मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांनी प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरजवडे ता.शिराळा ते मांगले (ता.शिराळा, जि.सांगली) जिल्हा हद्द पर्यंतच्या ३१.४ किमीचे राज्य मार्ग म्हणून दर्जान्नती केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित मांगले (ता.शिराळा जि.सांगली) जिल्हा हद्द ते जोतिबा जि.कोल्हापूर अद्यापपर्यंत राज्य

मार्ग म्हणून दर्जान्नती देण्याबाबत प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उर्वरित मांगले (ता.शिराळा, जि.सांगली) हद्द ते जोतिबा जि.कोल्हापूर या प्रमुख जिल्हा मार्गाचे राज्य मार्ग म्हणून दर्जान्नती होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२१-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

सदर रस्त्याबाबतचा शासन निर्णय क्र. रवियो-२०२४/प्र.क्र.४५/नियो-२, दिनांक १४/१०/२०२४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(३) व (४) होय, हे खरे आहे.

रस्त्याच्या दर्जोन्नती करीता शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०१४/प्र.क्र.६५/नियो-२, दिनांक २०/०७/२०१६ मध्ये नमूद निकषाच्या अधिन राहून उचित कार्यवाही करणेचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील गंगाखेड शहरातून जाणा-या राष्ट्रीय महामार्गावर रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(३२) ११९१५ (२३-०८-२०२५). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील गंगाखेड शहरातून जाणा-या महाराणा प्रताप चौक ते बसस्थानकपर्यंत राष्ट्रीय महामार्गावर खड्डे पडल्यामुळे वाहनधारकांसह प्रवासी, नागरिकांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर राष्ट्रीय महामार्गाचे काम मागील वर्षभरापासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे बंद पडलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महामार्गावरील पथदिवे गेल्या काही महिन्यांपासून बंद अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन महामार्गाच्या कामाकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करुन बंद पडलेले पथदिवे सुरु करण्याच्या अनुषंगाने काय उपाययोजना केल्या आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२८-०१-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही,

प्रश्नाधीन लांबीत रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीत असुन, सद्यस्थितीत वेळोवेळी मुरुम, सिमेंट क्राँक्रीटने खड्डे भरण्यात येऊन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही,

सदर लांबीतील पथदिवे सद्यस्थितीत चालू आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सावनेर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाकडून शेतकऱ्यांची पिळवणूक होत असल्याबाबत

**(३३) ११९२४ (१९-०८-२०२५). डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील सातबारावर नकाशा दुरुस्ती आणि कमी झालेल्या आराजीच्या नोंदीकरिता १८ वर्षाहून अधिक कालावधी उलटल्यावरही सावनेर उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाकडून टाळाटाळ करुन शेतकऱ्याची पिळवणूक केली जात असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यालयाच्या गैर वागणुकीमुळे अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने भूमी अभिलेख कार्यालयातील संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-१२-२०२५) :** (१), (२) व (३) उप अधीक्षक, भूमि अभिलेख, सावनेर या कार्यालयात पुनर्मोजणीमध्ये दुरूस्तीबाबत ४५६ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ३८५ अर्ज निकाली काढले असून ७१ अर्ज प्रलंबित आहेत. सदर प्रलंबित ७१ अर्जांपैकी १४ अर्ज एक वर्षाच्या आतील असून ५७ अर्ज एक ते पाच वर्षातील आहेत.

सदर कार्यवाही अर्धन्यायिक स्वरूपाची असून त्यामध्ये सहधारक/लगतधारक यांची सुनावणी, मौका चौकशी, फेरमोजणी इ. टप्पे समाविष्ट आहेत. प्रलंबित प्रकरणे कालबध्द कार्यक्रमाचे नियोजन करून निकाली काढण्याबाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, नागपूर यांना दिनांक १८ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, नागपूर यांच्याकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करण्यात तांत्रिक अडचण येत असल्याबाबत

**(३४) ११९६८ (१८-०८-२०२५). श्री.गजानन लवटे (दर्यापूर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संजय गांधी निराधार योजनेतील अंध, अपंग, वृध्द, दुर्धर आजार असलेल्या लाभार्थ्यांचे आधारकार्ड अपडेट होत नसल्यामुळे गेल्या कांही महिन्यांपासून त्यांचे मानधन बंद झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच उक्त लाभार्थ्यांचे रेशनकार्डही अपडेट होत नसल्यामुळे त्यांना धान्यापासूनही वंचित रहावे लागत असल्यामुळे त्यांची मोठी गैरसाये होत असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन राज्यातील निराधार योजनेतील लाभार्थ्यांना मानधन व धान्यापासून वंचित रहावे लागू नये याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ (२७-१०-२०२५) :** (१) लाभार्थ्याचे आधार बँक खात्याशी लिंक नसणे, आधार अद्ययावत नसणे, आधार प्रमाणीकरण नसणे, तसेच दिव्यांग व कुष्ठरोग पीडीत लाभार्थ्यांचे बोटांचे किंवा डोळयांचे ठसे स्कॅन न होणे, अशा विविध कारणांमुळे काही लाभार्थ्यांना अर्थसहाय्य मिळत नाही, हे खरे आहे.
(२) व (३) केंद्र शासनाच्या सूचनांनुसार शिधापत्रिकेसोबत आधार संलग्न करणे, तसेच ज्या लाभार्थ्यांकडे आधार क्रमांक नसेल अशा लाभार्थ्यांना आधार क्रमांक शिधापत्रिकांसोबत संलग्न करण्यास केंद्र शासनाकडील दिनांक २६/०३/२०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार मुदतवाढ देण्यात आलेली आहे. ज्या लाभार्थ्यांचे आधार क्रमांक शिधापत्रिकेसोबत संलग्न नसतील, अशा लाभार्थ्यांकडून इतर कागदपत्रांची पडताळणी करुन अन्नधान्याचा लाभ देण्याबाबत अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून दिनांक १० जुलै, २०२३ रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहे. तसेच संजय गांधी निराधार अनुदान योजना या योजनेतील लाभार्थ्यांना दरमहा रु.१५००/- इतके अर्थसहाय्य डी.बी.टी पोर्टलद्वारे माहे डिसेंबर, २०२४ पासून देण्यात येत आहे. या योजनेतील लाभार्थ्यांचे Aadhar अद्ययावत करणेबाबत तसेच त्यांचे बँक खाते आधारशी संलग्न करण्याबाबत शासनातर्फे जिल्हा/तालुका/मंडळस्तरावर युद्धपातळीवर विशेष मोहिम राबविण्याच्या सूचना वेळोवळी सर्व जिल्हाधिकारी यांना दिलेल्या आहेत. तसेच शासनाकडून लाभार्थ्यांचे Aadhar अद्ययावत करणे व त्यांची माहिती डी.बी.टी. पोर्टलवर भरणेबाबत माहे मार्च, २०२४ पासून सर्व जिल्हाधिकारी यांच्याकडे सातत्याने पत्राद्वारे व VC द्वारे पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हा पोलीस मुख्यालयांतर्गत नवीन पोलीस ठाणे आणि चौक्या उभारणीबाबत

**(३५) १२०१४ (०७-०८-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हा पोलीस मुख्यालयांतर्गत येणाऱ्या पोलीस ठाण्यांची संख्या मर्यादित असून लोकसंख्येच्या तुलनेत नवीन पोलीस ठाणे आणि चौक्या यांचे प्रमाण खुप कमी असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था नियंत्रित ठेवण्याकरिता नविन पोलीस ठाणे व चौक्या उभारणीबाबत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०२६) :** (१), (२) व (३) सद्यःस्थितीमध्ये कोल्हापूर जिल्हा पोलीस मुख्यालयांतर्गत पोलीस ठाण्यांची एकूण संख्या ३२ असून, त्याअंतर्गत पोलीस चौक्यांची एकूण संख्या २३ इतकी आहे.

कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांनी जिल्ह्यात नवीन पोलीस ठाणे व पोलीस चौकी निर्माण करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयास विविध प्रस्ताव सादर केले आहेत. तथापि, सदर प्रस्तावामध्ये त्रुटी आढळुन आल्याने पोलीस महासंचालक कार्यालय स्तरावरुन त्रुटीच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक, कोल्हापूर कार्यालयाशी पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. सदर पोलीस ठाणे निर्मितीचे परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर शहराला मुबलक पाणीपुरवठा करण्यासाठी एक्सप्रेस फिडर उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३६) १२०१६ (१९-०९-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहराला मुबलक पाणीपुरवठा व्हावा यासाठी काळम्मावाडी थेट पाईपलाईन योजना कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेला वीज पुरवठा करणारी मुख्य विद्युत वाहिनी वनविभागाच्या हद्दीमधून जात असल्याने पावसाळयामध्ये दरड कोसळणे झाडे पडणे अशा विविध नैसर्गिक कारणांमुळे वीज पुरवठा खंडित होऊन त्याचा परिणाम कोल्हापूर शहराच्या पाणीपुरवठ्यावर होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वीज पुरवठा खंडीत होत असल्याने एक्सप्रेस फिडरची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे,

काळम्मावाडी थेट पाईपलाईन योजनेला वीज पुरवठा करणारी मुख्य विद्युत वाहिनी ११०/३३ के.व्ही. बिद्री अतिउच्चदाब उपकेंद्रापासून निघून अंदाजे ३५ कि.मी. दूर असणाऱ्या राजापूरपर्यंत गेली आहे. सदर वाहिनी डोंगरदऱ्या घनदाट जंगल कालव्याच्या कडेने गेलेली आहे. या वाहिनीवर जोरदार पावसामुळे झाडे पडून अथवा पक्षी, वानरे तसेच जंगलातील झाडांच्या फांदया इ. संपर्कात आल्याने वीज वाहिनीमध्ये काही प्रमाणात बिघाड होतो, सदरचा बिघाड महावितरणमार्फत प्राधान्याने दुरुस्त करण्यात येतो.

(२) हे खरे आहे.

(३) सदरची वीज पुरवठा करणारी वाहिनी एक्सप्रेस फिडरच आहे. याशिवाय दुधगंगा (बिद्री) अतिउच्चदाब उपकेंद्रातून आणखी एक नवीन भूमिगत ३३ के. व्ही. एक्सप्रेस फिडरच्या मागणीला अनुसरून १३.५४ कोटी रुपये अंदाजित रक्कम कोल्हापूर महानगरपालिकेस कळविण्यात आली आहे. सदर कामासाठी आवश्यक असलेला निधी समर्पित वितरण सुविधा (DDF) योजनेअंतर्गत कोल्हापूर महानगरपालिकेकडून प्राप्त होताच सदरचे काम हाती घेऊन पूर्ण करण्यात येणार आहे.

याशिवाय, सदर वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या ३३ के. व्ही. वाहिनीकरिता बिद्री अतिउच्चदाब उपकेंद्रावरुन वीज पुरवठा करणाऱ्या वाहिनीचा नादुरुस्त कालावधी कमी करण्यासाठी ११०/३३ के. व्ही. राधानगरी उपकेंद्रामधुन निघणाऱ्या ३३ के. व्ही. गारगोटी फिडरवरुन दुसरी जोड वाहिनी प्रस्तावित केली आहे. त्याची अंदाजपत्रकीय रक्कम रु.२७,६४,४२५/- इतकी असून, त्याला महावितरणमार्फत मंजुरी देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जगत्-ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ हे वीरशैव लिंगायत खुल्या प्रवर्गातील आर्थिक मागास असलेल्या नागरिकांसाठी स्वतंत्र महामंडळ म्हणून मान्यता देण्याबाबत

**(३७) १२०१८ (२०-०७-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जगत्-ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ हे इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळातर्गत समाविष्ट न करता वीरशैव –लिंगायत खुल्या प्रवर्गातील आर्थिक मागास असलेल्या नागरिकांसाठी स्वतंत्र महामंडळ म्हणून मान्यता देऊन सुधारित आदेश निर्गमित करण्याबाबत औसा लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे मार्च, २०२५ मध्ये निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील मागणीच्या अनुषंगाने तपासून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (११-१२-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ लिंगायत समाजातील सर्वच दुर्बल घटकांना मिळण्याकरिता लिंगायत समाजासाठी जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ हे स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याबाबत प्राप्त मागणीच्या अनुषंगाने प्रशासकीय कार्यवाही निर्णयार्थ विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औसा (जि.लातूर) येथील "क" वर्गवारीच्या गावातील भूकंपग्रस्त बाधित व्यक्तीना भूकंपग्रस्त असल्याचे प्रमाणपत्र वितरीत करण्याबाबत**

**(३८) १२०३४ (०९-१०-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातूर) विधानसभा मतदारसंघातील भूकंपग्रस्त "क" वर्गवारीच्या गावातील गडीबाधित (भूकंपग्रस्त बाधित) व्यक्तीना भूकंपग्रस्त प्रमाणपत्र वितरीत करण्याबाबत जां.क्र.२०२३/भु.पु./कावि दिनांक २३ मार्च, २०२३ नुसार जिल्हाधिकारी लातूर यांनी कक्ष अधिकारी, कार्यासन आव्यप्र-२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पात्र असतानाही तांत्रिक कारणांमुळे प्रमाणपत्रापासून वंचित राहिलेल्या या भूकंपग्रस्त लाभार्थ्यांना खास बाब म्हणून प्रमाणपत्र वितरीत करण्याबाबतच्या सदरील प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रस्तावास मंजुरी देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) गढी बाधित व्यक्ती परंतू १ ते ३ वर्गवारी मध्ये ज्यांना रु. ३४,५००/- अनुदान देण्यात आले त्यांना भूकंपग्रस्त प्रमाणपत्र देणेविषयी शासन स्तरावरुन मार्गदर्शन होण्याची विनंती अतिरिक्त जिल्हाधिकारी (भुकंप पुनर्वसन), लातूर यांनी यापूर्वी दिनांक १८ जुलै, १९९८ च्या पत्रान्वये केली होती. त्यानुषंगाने, शासन स्तरावर प्राप्त

सूचनांच्या आधारे अतिरिक्त जिल्हाधिकारी (भूकंप पुनर्वसन, लातूर) यांनी त्यांचे दिनांक ०५ नोव्हेंबर, १९९८ चे पत्रान्वये यापुढे गढी बाधित व्यक्तींना त्यांची तांत्रिक सर्वेक्षणानुसार वर्गवारी १ ते ३ होती, त्यांना जरी नंतर रु.३४,५००/- एवढे अनुदान देण्यात आले होते, तरीही भूकंपग्रस्त प्रमाणपत्र देण्यात येऊ नये असे सर्व तहसीलदार, लातूर यांना कळविलेले आहे. आता पुन्हा जिल्हाधिकारी, लातूर यांनी दिनांक २३ मार्च, २०२३ च्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासन स्तरावर अमान्य करण्यात आला असून त्याप्रमाणे जिल्हाधिकारी, लातूर यांना दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २७ (३) व महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ चे नियम १० (२) मध्ये सुधारणा करुन सभासद संस्थांच्या सर्व संचालकांना मतदानाचा अधिकार देणेबाबत**

**(३९) १२०५६ (३०-०७-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २७ (३) व महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ चे नियम १० (२) मध्ये सुधारणा करुन सभासद संस्थांच्या सर्व संचालकांना मतदानाचा अधिकार देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०२५ मध्ये मा.मुख्यमंत्री आणि सहकार मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (०९-०१-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे. यासंदर्भात मा. श्री. अभिमन्यू पवार, विधानसभा सदस्य यांनी मार्च २०२५ मध्ये लक्षवेधी सूचना क्र.२२८६ उपस्थित केली होती.
(२) सदर लक्षवेधी सूचनेसंदर्भात सहकार आयुक्त कार्यालयाने दिनांक १७ मार्च, २०२५ रोजी शासनास खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केले आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २७ मध्ये सदस्यांच्या मतदानाच्या अधिकाराची तरतूद आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २७ (१) मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे.

"पोटकलमे (२) ते (७) दोन्ही धरुन, यात अन्यथा तरतूद केलेली असेल त्याव्यतिरिक्त कोणत्याही संस्थेच्या सदस्यास, तिच्या कामकाजात एकापेक्षा अधिक मत असणार नाही आणि तिने मत देण्याच्या प्रत्येक अधिकाराचा व्यक्तीश: वापर केला पाहिजे आणि त्याचा बदली व्यक्तीद्वारे वापर करता येणार नाही अशी तरतूद आहे."

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम २७(३) मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे. "ज्या संस्थेने आपल्या निधीचा कोणताही भाग, संघीय संस्थेच्या भागांमध्ये (शेअर्समध्ये) गुंतविला असल्यास त्या संस्थेस, त्या संघीय संस्थेच्या कामकाजामध्ये आपल्या वतीने मत देण्यासाठी आपल्या सदस्यांपैकी कोणत्याही एका सदस्याची नेमणूक करता येईल व त्याप्रमाणे अशा सदस्यास आपल्या संस्थेच्या वतीने मत देण्याचा अधिकार राहील.

परंतु, संघीय संस्थेच्या कोणत्याही नवीन सदस्य संस्थेने आपल्या निधीचा कोणताही भाग अशा संघीय संस्थेच्या भागांमध्ये (शेअर्समध्ये) गुंतविल्याच्या दिनांकापासून तीन वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर फक्त ती त्या संघीय संस्थेच्या कामकाजामध्ये मत देण्यास पात्र असेल:

परंतु आणखी असे की, कलम ७३ (क) अन्वये राखीव जागेसाठी निवडणूक असेल त्या बाबतीत कोणाही व्यक्तीला एकापेक्षा अधिक मत असणार नाही.

(३अ) संस्थेचा व्यक्तीगत सदस्य, अशा संस्थेचा सदस्य म्हणून त्याची नाव नोंदणी झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीसाठी त्या संस्थेच्या कामकाजात मत देण्याकरिता पात्र असणार नाही.”

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम १० (२) मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे.

“संस्थेची सदस्य संस्था किंवा फर्म असेल तर, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा क्षेत्रीय सहकारी निवडणूक अधिकारी समितीचा कार्यकाल समाप्त होण्यापूर्वी एकशे पन्नास दिवस अगोदर प्रतिनिधींची नावे मागविण्याचा दिनांक प्रसिध्द करेल. समितीचा कार्यकाल संपण्यापूर्वी एकशेवीस दिवस अगोदर संस्थेच्या वतीने किंवा फर्मचा प्राधिकृत प्रतिनिधी निवडणूकीत मतदान करणार असतील त्यांची नावे जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात पाठवेल. क्रियाशील सदस्य हा सदस्य संस्थेचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून संस्थेचा सदस्य असला पाहिजे.”

वरीलप्रमाणे अधिनियमातील तरतुदीचा विचार करता दिसून येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २७(१) मध्ये संघीय संस्थेच्या एका सभासद संस्थेस एक मत देण्याचा अधिकार आहे. संघीय संस्थेच्या सभासद असणाऱ्या सहकारी संस्थांमध्ये संचालक मंडळाची संख्या वेगवेगळी असून ती संख्या समान नाही. त्यामुळे संघीय संस्थेच्या सभासद संस्थांचे संचालकांचे प्रतिनिधीत्व समानतेने होईल असे दिसून येत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील मि-या नागपूर या राष्ट्रीय महामार्गावर भुयारी मार्ग होणेबाबत

**(४०) १२०८९ (२५-०८-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील मि-या नागपूर या राष्ट्रीय महामार्गावर मौजे दखिन येथे भुयारी मार्गाची आवश्यकता असून या गावाची लोकवस्ती महामार्गाच्या पश्चिमेकडे असून, त्यांच्या शेती, पशुपालन व शेळीपालनाच्या उपजिविकेची साधने पूर्वेकडे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामस्थांना स्मशानभूमी व बाजारपेठेत जाण्यासाठी कोणताही भुयारी मार्ग नसल्याने ग्रामस्थांना व जनावरांना जीव धोक्यात घालून महामार्ग ओलांडावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०२-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) रत्नागिरी-कोल्हापूर-नागपूर हा राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ असून त्याचे चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे. मौजे दखिन येथे ग्रामस्थांना स्मशानभूमी व बाजारपेठेत जाण्यासाठी ५ मी X ३मी भुयारी मार्गाची तरतूद करण्यात आलेली आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोळकेवाडी धरण व्यवस्थापन, उपविभाग अलोरे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील वसाहतीतील विविध प्रकारची निवासस्थाने विस्थापित करणेबाबत

**(४१) १२०९० (१९-०८-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळकेवाडी धरण व्यवस्थापन अंतर्गत उपविभाग अलोरे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील वसाहतीत सन १९६० ते १९७० च्या दरम्यान बांधण्यात आलेल्या विविध प्रकारच्या निवासस्थानांचा वापर बंद असून ती स्थाने मोडकळीस आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवासस्थाने विनावापर असून, यामधून शासनास मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे, याच अनुषंगाने उपविभागीय अभियंता, कोळकेवाडी धरण व्यवस्थापन उपविभाग, अलोरे यांनी विस्थापनासाठी प्रस्ताव कार्यकारी अभियंता, कोयना सिंचन विभाग, कोयना नगर यांच्याकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव गत १ वर्षापासून प्रलंबित असून या निवासस्थानांमध्ये सुरक्षा कर्मचारी नसल्यामुळे चोरीचे प्रमाण वाढत आहे, तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसानही होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवासस्थानांचे विस्थापन होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०१-२०२६) : (**१) होय, हे अंशत: खरे आहे.

कोळकेवाडी धरण अलोरे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील शासकीय वसाहतीत एकूण ९८५ निवासस्थाने असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| | |
|---|---|
| तिवरे धरणग्रस्तांच्या वसाहतीसाठी पाडण्यात आलेली निवासस्थाने आहेत | १७२ |
| सुस्थितीत निवासस्थाने | २९६ |
| मोडकळीस आलेली निवासस्थाने | ५१७ |
| निवासस्थान एकूण संख्या | ९८५ |

सुस्थितीत निवासस्थाने २९६ असून सध्या त्यापैकी २७६ निवासस्थाने वापरात असून २० निवासस्थाने रिक्त आहेत.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

उपविभागीय अभियंता, कोळकेवाडी धरण व्यवस्थापन उपविभाग, अलोरे यांनी विस्थापनासाठी सुधारीत प्रस्ताव कार्यकारी अभियंता, कोयना सिंचन विभाग, कोयनानगर यांच्याकडे सादर केला आहे. त्यानुसार २० इमारती निर्लेखीत करण्याचा प्रस्ताव विभागीय कार्यालयास सादर केला असून त्याची विभागीय स्तरावर छाननी सुरु आहे.

(३) हे, अंशत: खरे आहे.

सदर प्रस्ताव दिनांक २५ मे, २०२५ रोजी प्राप्त झाला असून त्याबाबत शासन प्रचलित निर्णयानुसार क्षेत्रीय स्तरावर उपलब्ध मनुष्यबळानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) क्षेत्रिय स्तरावर सदर प्रस्तावाची छाननी सुरू असून प्रचलित शासन निर्णयानुसार वापरण्यायोग्य नसलेल्या निरुपयोगी निवासस्थानांचे निर्लेखन करून त्या साहित्याचा जाहीर लिलावाद्वारे विल्हेवाट लावणे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याबाबत**

**(४२) १२०९४ (०८-०९-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याबाबत वारंवार आश्वासने देऊनही अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच धनगर समाजाला आरक्षण मिळण्यासाठी केंद्राकडे शिफारस करण्याची मागणी विविध संघटनांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (१८-०२-२०२६) :** (१) व (२) होय हे खरे आहे

(३) धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांना दिनांक २२.०९.२०१५ रोजीच्या पत्रान्वये धनगर व धनगड जमातींचा संशोधन /सर्व्हेक्षण करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवाल शासनाच्या विचाराधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील द्राक्ष व डाळींब व इतर निर्यातक्षम फळपिकांसाठी रेसिड्यू फ्री प्रयोगशाळा स्थापन करण्याबाबत**

**(४३) १२०९५ (२१-०७-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील द्राक्ष व डाळींब व इतर पिकांची मोठया प्रमाणात परदेशात निर्यात केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्यातक्षम फळपिकांसाठी रेसिड्यू फ्री प्रयोगशाळा सांगली जिल्ह्यात स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री व मा.कृषी मंत्री महोदयांना दिनांक १४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रयोगशाळा स्थापनेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (१५-१२-२०२५) :** (१) होय

(२), (३) व (४) राष्ट्रीय कृषि विकास योजना-कैफेटेरिया (DPR based stream) अंतर्गत महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांचा “Construction of Pesticides Residue Testing Laboratory, Sangli. प्रकल्प केंद्र शासनास अभिप्रायासाठी कृषि आयुक्तालय स्तरावरुन पाठविण्यात आला होता.

राज्यस्तरीय प्रकल्प छाननी समितीच्या (SLPSC) दिनांक०६ नोव्हेंबर,२०२३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तान्वये केंद्र शासनाकडील सादर केलेल्या प्रकल्पांचे प्रलंबित असलेल्या अभिप्रायाबाबत चर्चा होऊन प्रस्तुत प्रकल्प सुधारीत करुन सादर करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

त्यास अनुसारून कृषी आयुक्तालयाने संबंधीत अंमलबजावणी यंत्रणा महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नरखेड (जि.नागपूर) येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत सिंचन विहीरींचे अनुदान मिळण्याबाबत

**(४४) १२१२३ (०८-०९-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरखेड (जि.नागपूर) तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत सिंचन विहीरींचे अनुदान प्रलंबित असल्याने शेतकरी कर्जबाजारी होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत मागेल त्या शेतकऱ्यांना विहीर देणारी शासनाची योजना त्यामुळे व्यर्थ ठरत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यभरातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत सिंचन विहीरींचे अनुदान तातडीने देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (२९-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) केंद्र शासन व राज्य शासनाकडून निधी प्राप्त झाला असुन निधी वितरणाच्या प्रक्रियेत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विटा व आटपाडी (जि. सांगली) येथे कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये "शेतकरी भवन" उपलब्ध करुन देणेबाबत

**(४५) १२१३७ (३०-०७-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विटा व आटपाडी (जि.सांगली) येथे कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये "शेतकरी भवन" मंजूर करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी पणन मंत्री यांचेकडे दिनांक २१ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रस्तावास मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०९-१२-२०२५) :** (१) होय.

(२) व (३) कृषि उत्पन्न बाजार समिती विटा व आटपाडी यांचेकडून शेतकरी भवन बांधणेबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्तावास मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे मानेगाव (ता.जळगाव जामोद, जि.बुलढाणा) येथील प्रशासनाने मालकीच्या जमिनी अवैधरित्या ताब्यात घेतल्याबाबत**

**(४६) १२१४० (१९-०८-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मानेगाव (ता.जळगाव जामोद, जि.बुलढाणा) येथील मध्यप्रदेश भूसंहिताने मिळालेली मालकीची परंतु न्याय प्रविष्ठ गट क्रमांक ३६, ३५२ व ३५९ ह्या जमीनी प्रशासनाने अवैधरित्या ताब्यात घेतल्या असून याबाबतची कार्यवाही रद्द करण्याबाबतचे लेखी निवदने माजी महसूल मंत्री यांनी दिनांक ३ मार्च, २०१८ रोजी वा त्या दरम्यान शासनास सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जमिनीत वृक्षतोड, विटभट्टीसाठी मातीचे उत्खनन, माती विक्री व अतिक्रमण इत्यादीच्या अवैधरित्या केलेल्या कामाच्या कोट्यवधी रुपयाच्या गैरव्यवहाराबाबत दिनांक ४ जून, २०२०, ४ जुलै, २०२०, २० डिसेंबर, २०२२, ३ मे, २०२३ व दिनांक २४ मार्च, २०२५ रोजी शासनाकडे निवेदने देऊनही कार्यवाही न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, दिनांक २१ एप्रिल, २०१८ रोजी शासनाचा अध्यादेश व दिनांक ७ जून, २०१८ रोजीचे शासन परिपत्रक खोटे असल्यामुळे निर्गमित केलेले अध्यादेश व शासन परिपत्रकाबाबत शासनाची दिशाभूल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-१२-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे,

मा. श्री. विवेक पंडित, माजी आमदार यांनी त्यांच्या दिनांक ०२ मार्च, २०१९ रोजीच्या पत्रान्वये तत्कालीन मा.मंत्री(महसूल) यांना मौजे मानेगाव, ता.जळगाव जामोद जि.बुलढाणा येथील गट नं.३६,३५२ व ३५९ या जमिनीचे प्रकरण निकालात काढण्याबाबतची विनंती केली होती.

यानुषंगाने नमूद करण्यात येते की, मौजे मानेगाव, ता.जळगाव जामोद जि.बुलढाणा येथील गट नं.३६, ३५२,३५३ व ३५९ मधील जमीन खाजगी मालकीची नसून शासकीय मालकीची आहे. सदर जमीन ही गुरेचराई करिता राखीव ठेवण्यात आली होती. सदर गटात देखरेखीकरिता पंच नेमण्यात आले होते. सदर पंच मृत्यु झाल्यानंतर त्यांच्या जागी दुस-या पंचांची निवड होणे गरजेचे होते. मात्र, पंचांच्या मृत्युनंतर त्यांच्या वारसांनी चुकीच्या पध्दतीने गाव नमुना-७ मध्ये त्यांच्या नोंदी केल्या होत्या. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी, जळगाव जामोद यांनी सदर फेरफार रद्द करुन चुकीचे नाव सातबारामधून कमी करणेबाबत व सदर जमीन महाराष्ट्र शासनाचे नावे करण्याबाबत आदेश पारित केले आहेत. तसेच सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, अमरावती यांनी अपर

जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीमार्फत विषयांकित जमीन शासनाच्याच मालकीची असल्याची व तक्रारकर्ते वारंवार तक्रारी करुन शासकीय जमिनी हस्तगत करण्याचा प्रयत्न करित आहेत, असा अहवाल सादर करण्यात आला आहे.

(२) सदर गटावर शेती वहिती करिता व वीट भट्टी करिता केलेले अतिक्रमण निष्कासित करण्याबाबतची कारवाई करण्यात येत आहे. तसेच, प्रस्तावित जागेमध्ये वृक्षतोड करण्यात आलेली नसून मातीच्या उत्खननाबाबत वेळोवेळी शासन नियमांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवघाट ( ता.खानापूर, जि.सांगली) येथील शासकीय विश्रामगृह इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(४७) १२१७८ (०८-०९-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवघाट ( ता.खानापूर, जि.सांगली) येथील शासकीय विश्रामगृह इमारती जीर्ण व दुरवस्था झाल्याने परिसरात कचरा व दारुच्या बाटल्याचा खच पडल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदरहु इमारत बांधण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१३-०१-२०२६) :** (१) सदर इमारत ४-५ वर्ष बंद असल्याने इमारत व परिसराची दुरावस्था झालेली आहे.

(२) सदर इमारतीच्या दुरुस्तीसाठीचे (संरक्षक भिंत) अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून सद्यस्थितीत काम निविदा स्तरावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळातील रिक्त पदाचा अनुशेष बाबत

**(४८) १२२३७ (२४-०७-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील शेतकऱ्यांना सिंचन सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामंडळामध्ये एकूण मंजूर ११ हजार ३९ पदांपैकी केवळ ५ हजार २२२ पदेच भरण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या उक्त महामंडळात तब्बल ५ हजार ८१७ पदांचा अनुशेष निर्माण होवून उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०५-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

या महामंडळांतर्गत ४ प्रादेशिक कार्यालयांतर्गत १४ विभागीय मंडळ कार्यालय व मंडळ / विभागीय/ उपविभागीय कार्यालयांतर्गत गट अ ते गट ड संवर्गातील मंजुर, भरलेली व रिक्त पदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| कार्यालय | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| महामंडळ मुख्य कार्यालय | १० | ०९ | ०१ |
| मुख्य अभियंता, जसंवि, नागपूर | ४४७५ | १६७७ | २७९८ |
| मुख्य अभियंता, गो.प्र. जसंवि, नागपूर | १८७२ | ९७९ | ८९३ |
| मुख्य अभियंता, जसंवि, अमरावती | २५९३ | १५४१ | १०५२ |
| मुख्य अभियंता, वि.प्र. जसंवि, अमरावती | २०८९ | १०८८ | १००१ |
| एकुण वि.पा.वि.म., नागपूर | ११०३९ | ५२९४ | ५७४५ |

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

उपरोक्त नुसार ५७४५ ही रिक्त पदे दिसुन येत असली तरी या महामंडळांतर्गत उपलब्ध मनुष्यबळाकडुन योग्य नियोजन करुन प्रकल्प कामे पूर्ण करुन घेण्यात येत आहे.
(४) सद्य:स्थितीत जलसंपदा विभागाचा सुधारित आकृतीबंध निश्चित करण्याबाबत कार्यवाही सुरु असून विभागाचा सुधारित आकृतीबंध निश्चित झाल्यावर रिक्त पदांची पदभरती करण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील श्री स्वामी जगदगुरु शंकराचार्य करवीर पीठाच्या संस्थानास देण्यात आलेल्या जमिनीबाबत

**(४९) १२२५६ (१९-०८-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात देवस्थान इनाम जमिनीचे मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्रीचे व्यवहार केले जात असून, देवस्थान जमिनीबाबत शासन धोरण ठरवित असेपर्यत या जमिनींची दस्तनोंदणी करणे थांबविण्यात यावी, असे मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १४ मे, २०२५ रोजी सबंधित अधिकाऱ्यास निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कोनोली तर्फ आसनडोली या श्री स्वामी जगदगुरु शंकराचार्य करवीर पीठाच्या संस्थानास देण्यात आलेल्या २५९ एकर जमीनीपैकी सुमारे २०० एकरहून अधिक जमीनीच्या खरेदी-विक्री हस्तांतरणाबाबत मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रलंबित असलेल्या अपीलावर सुनावणी घेऊन निर्णय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-१०-२०२५) :** (१) होय.

मा. मंत्री (महसूल) यांनी दिनांक १३/०५/२०२५ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार नोंदणी

महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांचे पत्र क्र.का-४/२०२५/९२०, दिनांक १३ मे, २०२५ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याचे विक्री परवानगी आदेश असतील ते खेरीज करुन किंवा मा. न्यायालयाचे विक्रीस मंजुरी आदेश असतील ते खेरीज करुन राज्यातील कोणत्याही देवस्थान मिळकतीचे खरेदी-विक्री व्यवहारांचे दस्त नोंदणीस स्वीकारु नयेत, असे निर्देश संबंधित अधिकारी यांना दिलेले आहेत.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी दाखल अपीलांच्या अनुषंगाने दोन्ही पक्षकारांना सुनावणीची समान संधी देवून आदेश पारीत करण्याचे संकल्पीत आहे.

---

## निमगांव खालू (ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर) येथे प्रस्तावित सिमेंट प्रकल्पास स्थानिकांचा विरोध असल्याबाबत

**(५०) १२२८५ (०९-१०-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निमगांव खालू (ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर) येथे प्रस्तावित दालमिया भारत ग्रीन व्हिजन लिमिटेड कंपनीच्या सिमेंट प्रकल्पास या भागातील सुपीक जमीन वापरल्यास या प्रकल्पामुळे ती नापीक होण्याची शक्यता आहे तसेच वायू प्रदूषणात वाढ होऊन श्वसनाचे विकार वाढणार असल्याने या प्रकल्पास स्थानिक नागरिक व शेतकऱ्यांचा मोठा विरोध आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कंपनीने शेतकऱ्यांकडून त्यांना आवश्यक असलेल्या ८३ एकर जमिनीपैकी सुमारे ४० एकर जमीन फसवणूक करून घेतली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन स्थानिक व शेतकऱ्यांच्या हितासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
तहसील कार्यालय, श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर यांच्याकडून प्राप्त अहवालानूसार मे. दालमिया भारत ग्रीन लि. च्या प्रस्तावित सिमेंट कंपनी विरुद्ध फसवणुकीने जमिन घेतलेबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) सदर उद्योगाच्या सिमेंट प्रकल्पाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त सूचना व हरकतीच्या अनुषंगाने दिनांक २९ मे, २०२५ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्या अध्यक्षतेखाली जनसुनावणी आयोजित करण्यात आली होती. सद्यस्थितीमध्ये पर्यावरण अनुमती देण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.